# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड । गुरुवार । दि. १८ जून २०२६ । अंक १२ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## महागाई चार वर्षांच्या उच्चांकावर

**मुंबई :** देशभरात पेट्रोल-डिझेलच्या किंमती अवाच्या सव्वा झाल्या आहेत. इंधन दरात सातत्याने वाढ होत असल्याने प्रवासासह अन्य काही गोष्टी महाग झाल्या आहेत. आता घाऊक महागाई चार वर्षांच्या उच्चांकावर पोहोचली आहे. मे महिन्यात घाऊक महागाई ९.६८ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. याआधी एप्रिल महिन्यात महागाई ८.२६ टक्के होती. मे महिन्यातील महागाई दर हा ४३ महिन्यांत सर्वाधिक आहे. वाणिज्य मंत्रालयाने सोमवारी घाऊक महागाईची आकडेवारी जाहीर केली आहे. देशात दैनंदिन गरजेच्या वस्तू आणि इंधनाच्या किंमती वाढल्याने घाऊक महागाई वाढली आहे.

## विरार-अलिबाग कॉरिडॉर फास्ट ट्रॅकवर

**अलिबाग :** बहुप्रतीक्षित विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेच्या नवघर ते बलावली या टप्प्यातील कामाला गती मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. या प्रकल्पाच्या कामाला शासन स्तरावर प्रशासकीय मान्यता मिळाली असून लवकरच निविदा प्रक्रिया राबविण्यास सुरुवात करून प्रकल्पाच्या कामाला गती दिली जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिली आहे. विरार ते अलिबाग प्रवास अतिजलद करण्यासाठी विरार अलिबाग बहुउद्देशीय मार्गिका बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पाचे नियोजन हे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून केले जात आहे. परंतु अजूनही या पान २ वर

# शालेय गणवेशाची होणार तपासणी

## दर्जा तपासण्याचा शिक्षण विभागाचा निर्णय

। रायगड । प्रतिनिधी ।

राज्य सरकारच्या शालेय शिक्षण विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या गणवेशाच्या कापडाचा दर्जा निकृष्ट असल्याच्या तक्रारी दरवर्षी येत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या या गणवेशाची तपासणी करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. ही जबाबदारी जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली असून हे अधिकारी त्यांच्या पथकांसह काही शाळांना, गावांना अचानक भेटी देऊन विद्यार्थ्यांचे गणवेश, कापडाचा दर्जाची तपासणी करणार आहेत. कापड आणि गणवेशाचा दर्जा हलक्या प्रतीचा आढळल्यास संबंधित गणवेश पुरवठादारावर कारवाईही केली जाणार आहे.



काही कंत्राटदार कमी प्रतीचे कापड वापरून ३०० रुपयांऐवजी २०० रुपयांत गणवेश शिवत असल्याच्या तक्रारी आल्या पान २ वर

### गणवेशाची रक्कम मिळण्यास विलंब

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना राज्य सरकारकडून दरवर्षी गणवेशाचे जोड पुरवले जातात. त्यासाठी प्रति गणवेश ३०० रुपये दर निश्चित केला आहे. गणवेश भत्त्यापैकी ४० टक्के रक्कम केंद्राकडून येत असून ६० टक्के रकमेची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून केली जाते. त्यानुसार यंदा प्रति विद्यार्थी ३०० पैकी २४० रुपयांची प्रतिपूर्ती राज्य शासनाने विविध शाळांना आणि केंद्रांना केली आहे. उरलेल्या ६० रुपयांसाठी राज्य सरकारही केंद्राच्या निधीवर अवलंबून आहे. अद्याप पूर्ण रक्कम आली नसली, तरी केंद्राकडून हा निधी लवकरच येणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण विभागातील एका अधिकाऱ्याने दिली. तसेच गणवेश पुरवठा करताना कंत्राटदारांनी गणवेशाच्या दर्जात कोणतीही तडजोड करू नये, असे त्यांनी सांगितले.

### जबाबदारी शिक्षण आयुक्तांची

गणवेश तपासण्याची जबाबदारी शिक्षण आयुक्तांवर सोपविण्यात आली आहे. त्यानुसार शाळा सुरू झाल्यानंतर शिक्षण आयुक्तांच्या नेतृत्त्वाखाली प्रत्येक जिल्ह्यातील केंद्रप्रमुख, पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी यांना गणवेश तपासणीचे अधिकार देण्यात आले आहेत. तसेच जिल्ह्यातील शिक्षणाधिकारीही विविध शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या गणवेशांचा दर्जा तपासणार आहेत. या तपासणीत एखाद्या गणवेश पुरवठादाराने हलक्या प्रतीचे कापड वापरल्याचे आढळल्यास त्याच्याविरोधात कारवाई केली जाणार आहे.

> **रायगड जिल्ह्यात ९१ हजार १४० विद्यार्थी गणवेश पात्र लाभार्थी आहेत. यामध्ये ४५ हजार २३६ मुली, २९६८ अनुसूचित जाती मुले, १४६१९ अनुसूचित जमाती मुले, ३३१४ दारिद्र्य रेषेखालील मुले, २३ हजार ५९१ समग्र जनरल अधिक ओबीसी प्रवर्गातील मुले, १४१२ पीएमश्री जनरल अधिक ओबीसी मुले अशा विद्यार्थी लाभार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश खरेदी करण्यासाठी २ लाख १८ हजार ७३ हजार ६०० रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे.**
>
> **- ललिता दहितुले**
> **शिक्षणाधिकारी ( प्राथमिक )**
> **रायगड जिल्हा परिषद**

# महाड, पोलादपूरमधील शिक्षण प्रश्न तापला

## प्रश्नांचा भडिमार करीत शिक्षण अधिकाऱ्यांना धरले धारेवर

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

महाड-पोलादपूरमधील शिक्षण विभागातील अनियमितता, मनमानी कारभार, विद्यार्थ्यांच्या हिताच्या प्रलंबित तक्रारी अशा अनेक प्रश्नांबाबत जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडे निवेदन देण्यात आले. मात्र अधिकाऱ्यांकडून त्याची दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या मनविसेच्या पदाधिकाऱ्यांनी बुधवारी (दि.१७) मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्यासह शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांची भेट घेतली.

यावेळी महाड पोलादपूरमधील शैक्षणिक प्रश्न मोठ्या प्रमाणात तापला. प्रश्नांचा भडिमार करीत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. अखेर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही तात्काळ केली जाईल असे आश्वासन दिले. त्यानंतर हे प्रकरण शांत झाले.

यावेळी पान २ वर

> महाड पोलादपूरमधील शाळेतील शिक्षकांची अनुपस्थिती, पोषण आहार अशा अनेक प्रश्नांबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेतली. आरोप असलेल्या अधिकाऱ्यांचे निलंबन तातडीने केली जाईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या बैठकीत आश्वासन दिले असून योग्य ती कार्यवाही केली जाईल असे त्यांनी सांगितले आहे.
>
> - ओमकार मोहिरे, अध्यक्ष
> पोलादपूर तालुका महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना

## वेधक

### पवनराजे प्रकरणाचा शनिवारी निकाल

**मुंबई :** प्रमुख आरोपी म्हणून राज्याचे माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यावर चालवण्यात आलेल्या पवनराजे निंबाळकर व त्यांच्या चालकाच्या २० वर्षांपूर्वीच्या हत्या प्रकरणाचा बहुप्रतिक्षित निकाल येत्या शनिवारी विशेष सीबीआय न्यायालय देणार आहे. वास्तविक, विशेष न्यायालय मंगळवारी या प्रकरणाचा निकाल देणार होते. परंतु, निकालपत्र तयार नसल्याने आणि ते तयार करण्यासाठी आणखी काही दिवसांची गरज भासणार असल्याचे स्पष्ट करून न्यायालयाने निकाल शनिवारपर्यंत पुढे ढकलला. प्रकरणाचा निकाल आता २० जून रोजी देण्यात येणार असल्याने विशेष न्यायालयाचे न्यायाधीश एस. आर. नावंदर यांनी पाटील यांच्यासह पान २ वर

### मिसिंग लिंक पुलावर अपघात

**मुंबई :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर बुधवारी (दि.१७) सकाळी भीषण अपघात झाला. या अपघातात मिसिंग लिंकवर असलेल्या पुलावर तीन वाहने एकमेकांवर आदळली. सुदैवाने यात जीवितहानी झाली नाही. मात्र अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. मिसिंग लिंकच्या पुलावर बुधवारी सकाळी ही दुर्घटना घडली. प्राप्त माहितीनुसार, अपघातग्रस्त तिन्ही गाड्या मुंबईहून पुण्याच्या दिशेने निघाल्या होत्या. यातील फॉर्च्युन गाडी अचानकपणे मिसिंग लिंकवरील केबल स्टे पूलाजवळ तिसऱ्या मार्गिकेवर थांबली. त्यामुळे मागून येणारी हुंदाई कंपनीची वेरना कार वेगाने येऊन फॉर्च्युनर पान २ वर

# रस्त्याच्या दिरंगाईविरोधात एल्गार

## चणेरे नाक्यावर रास्ता रोको, ३० जूनपर्यंत काम पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन

। सत्यप्रकाश आडाव ।
। चणेरा ।

रोहा तालुक्यातील चणेरे-बिरवाडी-पांगळोली-उसर मार्गे रोहे या महत्त्वाच्या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामात होत असलेल्या दिरंगाईविरोधात बुधवारी ग्रामस्थांचा संताप अखेर रस्त्यावर उतरला. चणेरे नाक्यावर महिला, ज्येष्ठ नागरिक आणि युवकांनी मोठ्या संख्येने एकत्र येत रास्ता रोको आंदोलन छेडले.

आंदोलनकर्त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना आणि संबंधित ठेकेदाराला जाब विचारत तीव्र नाराजी व्यक्त केली. अखेर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ३० जून २०२६ पर्यंत रस्ता वाहतुकीयोग्य करून देण्याचे लेखी आश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.




चणेरे-बिरवाडी-गायचोळ वाडी तसेच पांगळोली-उसर मार्गे रोहे या परिसरातील नागरिकांसाठी हा रस्ता दळणवळणाचा प्रमुख मार्ग आहे. मात्र डांबरीकरणाच्या कामासाठी अपूर्ण अवस्थेत सोडण्यात आल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळा सुरू होण्याच्या उंबरठ्यावर असताना रस्त्यावर खड्डे, चिखल आणि उखडलेले भाग यामुळे पादचाऱ्यांची गैरसोय होण्याची शक्यता आहे.

सामाजिक कार्यकर्ते प्रकाश विचारे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ आणि महिलांनी चणेरे नाक्यावर रास्ता पान २ वर

# पाणी नाही...पण पाणीपट्टी हवी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

नागाव ग्रामपंचायत हद्दीत गेल्या अनेक महिन्यांपासून गंभीर पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली असून नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा मिळत नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे अनेक भागांत पाणी पोहोचत नसतानाही घरामागे वार्षिक पाणीपट्टी आकारली जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे.

या पार्श्वभूमीवर नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी बुधवारी (दि. १७) जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सरोदे यांची भेट घेऊन प्रशासनाला थेट जाब विचारला. नागाव ग्रामपंचायत हद्दीतील बंदर, पाल्हे, शास्त्रीनगरसह अनेक भागांमध्ये अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत आहे. काही भागांमध्ये अत्यल्प दाबाने पाणी येत असून काही ठिकाणी अनेक दिवस नळ कोरडे राहत आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासह दैनंदिन गरजांसाठी नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक कुटुंबांना खासगी टँकर किंवा पर्यायी साधनांवर अवलंबून राहावे लागत असून त्यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे. नागाव हे अलिबाग पान २ वर



- **नागाव सरपंचांचा जिल्हा प्रशासनाला थेट जाब**
- **पाणी प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी; यंत्रणेचे उपाययोजनांचे आश्वासन**

> पाणी मिळत नसताना नागरिकांकडून पाणीपट्टी आकारणे अन्यायकारक आहे. नागावमधील पाणी प्रश्न तातडीने सोडवण्यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. नागावमधील बंदर, पाल्हे आणि इतर अनेक भागांमध्ये पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. अशा परिस्थितीत नागरिकांकडून पूर्ण पाणीपट्टी वसूल करणे योग्य नाही. पाणीपुरवठा सुरळीत करण्यासह पाणीपट्टीत सवलत देण्याबाबत सकारात्मक निर्णय व्हावा, ही आमची मागणी आहे.
>
> - हर्षदा मयेकर, सरपंच, नागाव

# अशक्यप्राय गोष्ट शक्य करून दाखवली

## उंबर्डे जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी पट २ वरून २४ वर

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यातील जिल्हा परिषद उंबर्डे शाळेने यंदा एक प्रेरणादायी यशोगाथा घडवून आणली आहे. गतवर्षी अवघ्या दोन विद्यार्थ्यांवर आलेल्या या शाळेचा विद्यार्थीपट आज २४ वर पोहोचला असून, हे यश दोन जिद्दी शिक्षिका, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ आणि कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित मानले जात आहे.

सन १९०५ मध्ये स्थापन झालेल्या या शाळेचा शैक्षणिक वारसा गौरवशाली असला तरी २०२५ मध्ये शाळेतील विद्यार्थी संख्या केवळ दोनवर आली होती. त्यामुळे शाळेच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला होता. मात्र सप्टेंबर २०२५ मध्ये या शाळेवर बदली होऊन आलेल्या जिजाबाई वारंजे आणि प्रतिभा भोसले यांनी परिस्थिती बदलण्याचा निर्धार केला.




दोन्ही शिक्षिकांनी उंबर्डे, पिंपळपाडा आणि परिसरातील पालकांच्या घरोघरी भेटी देऊन संवाद साधला. शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम आणि शासकीय योजनांची माहिती पालकांपर्यंत पोहोचवली. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे पालकांचा शाळेवरील विश्वास वाढत गेला आणि त्याचे रूपांतर प्रवेशसंख्येत झाले. परिणामी अवघ्या दोन विद्यार्थ्यांची शाळा आज २४ विद्यार्थ्यांची झाली आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी झालेल्या प्रवेशोत्सव कार्यक्रमाने शाळेत नवचैतन्य निर्माण केले. विद्यार्थ्यांच्या वाढलेल्या उपस्थितीमुळे शाळेचे वातावरण पुन्हा एकदा उत्साहाने फुलून गेले आहे.

या यशामागे पान २ वर

## टीईटी परीक्षा २८ जूनला

**पुणे :** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ पुढे ढकलण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांनी घेतला आहे. टीईटी परीक्षा २१ जूनला होणार होती. परंतु त्या दिवशी राष्ट्रीय परीक्षा संस्था मार्फत देशभरात राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षा आयोजित करण्यात आल्याने आता महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा आता २८ जूनला घेतली जाणार आहे. परीक्षेचे आयोजन सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी तसेच परीक्षार्थ्यांचे हित लक्षात घेऊन आता येत्या २८ जूनला घेतली जाईल, असे परिषदेने जाहीर केले आहे. सुधारित वेळापत्रकानुसार, १६ जून ते २८ जून २०२६ या कालावधीत संगणकीय प्रणालीद्वारे प्राप्त करून त्याची मुद्रित प्रत काढता येणार आहे. काही प्रशासकीय कारणांमुळे या वेळापत्रकात बदल होण्याची शक्यता आहे.

# नयन पाटील यांचे निधन

## चित्रलेखा पाटील यांची सांत्वनपर भेट

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील पेझारी-आंबेपूर येथील नयन नंदकुमार पाटील या तरुणाचा अपघाती मृत्यू झाला. याघटनेची माहिती मिळताच शेकाप प्रवक्त्या, पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी पेझारी येथील त्यांच्या निवासस्थानी जाऊन सांत्वनपर भेट घेतली. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे खारेपाट विभागातील अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नयन नंदकुमार पाटील या तरुणाचे मंगळवारी (दि.९) अलिबाग-वडखळ मार्गावरील संजीवनी हॉस्पीटल समोर अपघाती निधन झाले. हे वृत्त समजताच चित्रलेखा पाटील यांनी पेझारी येथील नंदकुमार पाटील, शिवभक्त जयकुमार पान २ वर






### आयआयटीएम व पुरातत्त्व विभागाचा सामंजस्य करार | प्रागैतिहासिक कालखंडावर पडणार प्रकाश

# कोकणातील कातळशिल्पांचे रहस्य उलगडणार

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

कोकणातील हजारो कातळशिल्पांचे रहस्य लवकरच उलगडणार आहे. जागतिक महत्त्वाच्या कातळशिल्पांचा वैज्ञानिक अभ्यास, डिजिटल दस्तऐवजीकरण आणि संवर्धनासाठी पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय आणि आयआयटीएम प्रवर्तक टेक्नालॉजी फाऊंडेशन, चेन्नई यांच्यात सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार झाला.



पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयाने रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुमारे ८० गावांमध्ये सर्वेक्षण करून आतापर्यंत जवळपास २ हजार कातळशिल्पे प्रकाशात आणली आहेत. प्रामुख्याने प्रागैतिहासिक कालखंडातील या कातळशिल्पांमध्ये हत्ती, एकशिंगी गेंडा, कासव, पाणघोडा, पक्षी, मानवी आकृत्या तसेच अनेक अनाकलनीय आकृत्यांचा समावेश आहे.

सामंजस्य करारामुळे प्रकल्पातून तयार झालेला डेटा, संशोधन अहवाल, नकाशे, डिजिटल दस्तऐवजीकरण आणि अभिलेख यांचे परस्पर आदान-प्रदान सुलभ होणार आहे. तसेच प्रकल्पासाठी वापरण्यात आलेली तांत्रिक उपकरणे आणि संशोधन साधने संचालनालयाकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुलभ होईल. कोकणातील अनमोल पुरातत्त्वीय आणि सांस्कृतिक वारशाचे महत्त्व लक्षात घेऊन देवीहसोळ, कशेळी, रुंढे तळी, उक्षी, बारसू, जांभरूण, देवाचे गोठाणे, कुडोपी आणि गोवा राज्यातील फंसाईमाळ या नऊ कातळशिल्प स्थळांचा समावेश युनेस्कोच्या जागतिक वारसा नामांकनाच्या तात्पुरत्या यादीत करण्यात आला आहे.

या कातळशिल्पांचा वैज्ञानिक अभ्यास व्हावा याकरिता संचालनालय आणि आयआयटी मद्रासचा एक प्रमुख विभाग असलेल्या आयआयटीएम प्रवर्तक टेक्नालॉजी फाऊंडेशन यांच्यात सामंजस्य करार झाला.

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षरी झाली.

# ‘शारलोट’ मधील गाळ ठेकेदाराच्या फायद्यासाठी

## गाळ न काढताच निधी लाटण्याचा डाव; मनोज खेडकर यांचा आरोप

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान येथील ब्रिटिश कालीन शार्लोट लेक या तलावाचे मागील तीन वर्षापासून संवर्धनाचे काम सुरू आहे. पावसाळा नजरेसमोर ठेवून गेली काही महिने तलावातील गाळ काढण्यात येत नव्हता.दरम्यान तलावातील पाणी सोडल्यानंतर त्या तलावात गाळ काढून टाकण्यासाठी ६० टक्के निधी राखीव ठेवण्यात आला होता.तो निधी तलावातील गाळ न काढताच लाटण्याचा ठेकेदाराचा प्रयत्न पाणी सोडल्यावर माती देखील पाण्याबरोबर वाहून जाईल आणि आपल्याला गाळ काढला असल्याचे दाखवून निधी लाटण्याचे कारस्थान सध्या सुरू असल्याचा दावा माथेरानचे माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी केला आहे.



माथेरान शहरात पिण्याच्या पाण्यासाठी असलेल्या शार्लोट लेक मधील पाण्याची साठवण क्षमता जंगलातील गाळ,माती वाहून आल्याने कमी झाली आहे.पावसाळ्यामध्ये शार्लोट तलावातून पाणी शहरात वितरित केला जातो. गाळ काढल्याने तलावाची क्षमता वाढावी यासाठी माथेरान नगरपरिषदेचे मालकीच्या शार्लोट लेक तलावाचे संवर्धन करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या अमृत-२ कार्यक्रमांतर्गत मंजूर झाला आहे. माथेरान नगरपरिषदेकडून माथेरान शार्लोट तलाव सुशोभिकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सादर करण्यात आले होते. सदर कामासाठी ४९९.८२ लक्ष किंम तीच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून २०२३ मध्ये मान्यता देण्यात आली आहे.या अंदाजपत्रकानुसार तलावातील गाळ काढण्याचे आणि वाहतूक परिसरातील जंगलात टाकणे तसेच सदर तलावातील गेट आणि ब्रीजची बाजू दुरुस्ती करीताची तरतूद आहे.सदर कामास प्रशासकीय मंजूरी मिळाल्याचे मिळाली असून माथेरान नगरपरिषदेस राज्य शासनाने राज्य सरोवर संवर्धन योजनेतंर्गत माथेरान येथील शार्लोट तलावास पर्यावरणदृष्ट्या संवर्धन व संरक्षण करण्याचे काम केले जाणार होते.

सध्या माथेरान शार्लोट तलावामध्ये अंदाजे १५ फुट इतका गाळ असण्याची शक्यता आहे.काही दिवसांनी पाऊस सुरू होणार असून पावसाळा सुरू झाल्यानंतर शार्लोट लेक रिकामा काढण्याचा घाट घातला जात आहे.पहिल्या पावसानंतर शारलोट लेक मधील उरले सुरले पाणी तलावातील पाणी सोडले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या तलावातील गाळ २०१३ मध्ये श्रमदान करून काढले होते.त्यानंतर लेकमधील माती गाळ आणि दगड काढण्यात आलेले नाहीत. लेकच्या संवर्धन कामासाठी पाच कोटींचा निधी मंजूर असून या कामामध्ये मुख्य काम हे माती गाळ काढणे ही होते. काढलेली माती आजूबाजूच्या जंगलात झाडांच्या मुळं मजबूत करण्यासाठी टाकण्याचे काम होते. मात्र ठेकेदार कंपनी वर नगरपरिषद मेहेरबान असल्याने इतकी वर्षे झाली तरी तलावातून माती काही काढण्यात येत नाही. ठेकेदारावर देखील पालिका दबाव टाकत नसल्याने मनोज खेडकर यांनी संशय व्यक्त केला आहे.

### पाणी सोडून निधी लाटण्याचा डाव...

तलावातील उरलेसुरले पाणी पावसाळा सुरू झाल्यावर सोडून द्यायचे आणि त्या पाण्याबरोबर तलावातील गाळ देखील वाहून जाईल. त्याचा फायदा तलावातील गाळ काढण्याचे काम शिल्लक राहणार नाही आणि त्यामुळे गाळ काढण्यासाठी असलेला करोडींचा निधी गाळ न काढताच आयता ठेकेदाराला मिळू शकतो. हा निधी ठेकेदार पालिकेच्या अधिकाऱ्यांशी साटेलोटे करून करण्याचा शक्यता आहे असा भीती माजी नगराध्यक्ष खेडकर व्यक्त करीत असल्याने माथेरानमध्ये खळबळ माजली आहे.

# प्रदूषणकारी कंपन्यावर कारवाईसाठी मुख्यमंत्र्यांना साकडे

| रसायनी | प्रतिनिधी |

खालापूर तालुक्यातील जाणाऱ्या पाताळगंगा नदीत औद्योगिक क्षेत्रातील काही कारखान्यांकडून रसायन मिश्रित सांडपाणी सोडले जात असल्याने पाताळगंगा नदी प्रदूषित होत आहे. सदर सांडपाण्यामुळे नदीचे पाणी काळपट झाले असून दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे नदीपात्र, जलचर, पर्यावरण तसेच परिसरातील नागरिक व आदिवासी बांधवांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पाताळगंगा नदीच्या पाण्यावर शेतीत मळ्यात, भाजी पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचा उदरनिर्वाहाचा साधनावर रसायनमिश्रित पाण्यामुळे संक्रांत आली आहे.परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. याविरोधात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी पाताळगंगा नदीत रात्रीच्या अंधारात किंवा सुट्टीच्या दिवशी नाल्यात रासायनिक सांडपाणी सोडणाऱ्या कंपन्यांवर कडक कारवाई करावी, यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड विभाग, मंत्री आदिती तटकरे, मंत्री भरत गोगावले, जिल्हाधिकारी पर्यावरण विभाग, जिल्हा पोलीस अधिक्षक, स्थानिक खासदार, आमदार व प्रशासन यांना लेखी पत्रव्यवहार करून दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष राकेश खराडे यांनी केली आहे. परिसरातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी.अशी मागणी केली असून पाताळगंगा नदीपात्रात रसायन मिश्रित सांडपाणी सोडणाऱ्या कंपन्यावर कडक कारवाई न केल्यास हे प्रकरण राष्ट्रीय हरित लवाद यांच्या कडे पाठविण्यात येणार असल्याचे राकेश खराडे यांनी निवेदन अहवालात म्हटले आहे.

पान १ वरून

## विरार-अलिबाग कॉरिडॉर फास्ट ट्रॅकवर

प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झाली नाही. या मार्गिकेमुळे पालघर, रायगड आणि संपूर्ण कोकण पट्ट्यातील औद्योगिक, व्यापारी, पर्यटन आणि सामाजिक विकासाला मोठी चालना मिळणार असून रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होणार आहेत. यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

१२९ किमीच्या विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकेतील नवघर ते बलवली अशा ९८ किमीच्या मार्गिकेच्या बांधकामासाठी बांधा-वापरा-हस्तांतरीत करा तत्वानुसार निविदा काढण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला होता.

या प्रस्तावाला नुकतीच प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. कंत्राटदाराची नियुक्ती झाल्यानंतर, सर्व आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय बाबींची पूर्तता केली जाईल. त्यानंतर या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामास प्रारंभ होणार असून, हे काम निश्चित केलेल्या विहित कालावधीत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट्ये एम.एस.आर.डी.सी.कडून ठेवण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता मुक्तेश वाडकर यांनी एका पत्राद्वारे ही माहिती दिली आहे. या मार्गिकेमुळे वसई-विरार आणि अलिबाग दरम्यानचा प्रवास अधिक जलद आणि सोयीचा होणार असल्याने या भागातील विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

## महाड, पोलादपूरमधील शिक्षण प्रश्न तापला

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष प्रतिक राहटे, मनसेचे माजी दक्षिण रायगड जिल्हा सचिव अमोल पेणकर, विद्यार्थी सेनेचे उपाध्यक्ष विवेक ठोंबरे, महाड तालुका अध्यक्ष अथर्व देशमुख, उपाध्यक्ष रोहित सावंत, पोलादपूर तालुका संपर्क अध्यक्ष सुरज कदम, बिरवाडी शहर अध्यक्ष साहिल राणे, अलिबाग तालुका मनसे अध्यक्ष सिध्देश म्हात्रे, सचिव विनायक पालेकर, आदी पदाधिकारी, शिष्टमंडळ उपस्थित होते.

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या पदाधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, महाड व पोलादपूर तालुक्यातील शिक्षण विभागातील विविध प्रशासकिय अनियमितता, शैक्षणिक व प्रशासकीय त्रुटी, आर्थिक व्यवहारातील संशयास्पद बाबी, मनमानी कारभार,विद्यार्थी हिताच्या अनेक प्रश्नांबाबत जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडे पत्र देण्यात आले आहे. वेळोवेळी पाठपुरावा केला निवेदन दिले. परंतु, प्रतिसाद मिळाला नाही. कोकण आयुक्त, उपशिक्षण संचालक यांनी आदेश देऊनही शिक्षण विभागाने कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हितासह अन्य प्रश्नांबाबत शिक्षण विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे की काय असा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी यांच्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेतली. पोलादपूर, महाडमधील शिक्षण विभागाच्या प्रश्नांबाबत जे निवेदन दिले त्यांची काय कार्यवाही अशा अनेक प्रश्नांचा भडिमार पदाधिकाऱ्यांनी केले. शिक्षणाधिकारी दहीतुले यांना धारेवर धरण्यात आले. अखेर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रश्नांबाबत दखल घेऊन कार्यवाही केली जाईल असे आश्वासन दिले. त्यानंतर ही बैठक संपली.

## पाणी नाही...पण पाणीपट्टी हवी

तालुक्यातील महत्त्वाचे पर्यटन गाव मानले जाते. दरवर्षी येथे पर्यटकांची संख्या वाढत असताना पाणीपुरवठा व्यवस्थेवर ताण वाढत आहे. मात्र वाढत्या गरजांच्या तुलनेत पाणीपुरवठा यंत्रणा सक्षम करण्यात आलेली नसल्याची तक्रार ग्रामस्थांकडून केली जात आहे. भविष्यात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता असल्याने तातडीने शाश्वत उपाययोजना करण्याची मागणी सरपंच मयेकर यांनी अधिकाऱ्यांकडे केली. ग्रामपंचायतीमार्फत यापूर्वीही अनेक वेळा ग्रामीण पाणीपुरवठा विभाग तसेच संबंधित प्रशासनाकडे लेखी निवेदने देण्यात आली होती. गावातील पाणीटंचाईची गंभीर परिस्थिती निदर्शनास आणून देत नागावला पाणीटंचाईग्रस्त गाव घोषित करण्याची मागणीदेखील करण्यात आली होती. मात्र अद्याप या समस्येवर ठोस व कायमस्वरूपी उपाययोजना झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला. नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा होत नसतानाही प्रति घर वार्षिक सुमारे २,२०० रुपयांची पाणीपट्टी आकारली जात असल्याचा मुद्दाही यावेळी उपस्थित करण्यात आला. पाणी मिळत नसताना कोणत्या निकषांवर ही आकारणी केली जाते, असा सवाल सरपंच मयेकर यांनी उपस्थित केला. पाणीपुरवठा नियमित होईपर्यंत पाणीपट्टीत सवलत देण्याची मागणीही करण्यात आली.

यावेळी अतिरिक्त जलस्त्रोत उपलब्ध करून देणे, विद्यमान योजनेची तांत्रिक पाहणी करणे, कमी दाब व गळतीच्या समस्या तातडीने दूर करणे तसेच दीर्घकालीन आणि शाश्वत पाणीपुरवठा आराखडा तयार करणे या मागण्यांचे निवेदन संबंधित विभागाला देण्यात आले. कार्यकारी अभियंता सरोदे यांनी या मागण्यांची दखल घेत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तसेच पाणी प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले.

## नयन पाटील यांचे निधन

पाटील यांच्या कुटुंबीयांची पेझारी येथील निवासस्थानी जाऊन सांत्वनपर भेट घेतली. तसेच स्व.नयन पाटील यांची पत्नी, शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते चंद्रकांत भास्कर पाटील यांची कन्या असल्याने त्यांच्या कुटुंबाची देखील चित्रलेखा पाटील यांनी सांत्वनपर भेट घेऊन विचारपूस केली.

नयन पाटील या तरुणाच्या अपघाती निधनाबद्दल बोलताना चित्रलेखा पाटील यांनी तीव्र दुःख व्यक्त केले. त्या म्हणाल्या की, अलिबाग-वडखळ या रस्त्यावर अनेक अपघात होत आहेत. गेल्या वर्षभरामध्ये अनेक तरुणांचे अपघाती निधन वडखळ ते पोयनाड दरम्यान झाले असून अनेक तरुण किरकोळ जखमी झाले आहेत. या रस्त्यावर इस्पात कंपनीच्या अवजड वाहनांची वाहतूक तसेच अन्य वाहनांची वर्दळ प्रचंड वाढली आहे. बेसुमार वाहने चालविली जात आहेत. त्यामुळेच हे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. सार्वजनिक बांधकाम, रस्ते विकास महामंडळ, यांनी अपघाताची ठिकाणे, दिशादर्शक फलक लावणे आवश्यक आहे. गतिरोधकाचेही फलक जागोजागी लावणे आवश्यक आहे. यासंदर्भामध्ये बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. नयन पाटील हा पेझारी आंबेपूर गावातील होतकरू तरुण होता. तो त्यांच्या कुटुंबातील नंदकुमार पाटील यांचा एकुलता एक आधार होता. नयन यांच्या निधनाने त्यांच्या कुटूंबात मोठी पोकळी निर्माण झाली असल्याचे दुःख चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केले.

## रस्त्याच्या दिरंगाई विरोधात एल्गार

रोको आंदोलन केले. आंदोलनामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. आंदोलनस्थळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावण्यात आले. ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांना कामातील विलंबाबाबत जाब विचारत ठेकेदाराच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

यावेळी अधिकारी आणि ग्रामस्थांमध्ये शाब्दिक चकमक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. वारंवार आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्षात कामाची गती वाढत नाही, अशी नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे, या रस्त्याच्या कामासाठी ग्रामस्थांना आतापर्यंत पाचव्यांदा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागला आहे. यापूर्वीही अनेक वेळा निवेदने, बैठका आणि आंदोलनांद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र त्यानंतरही काम संथगतीने सुरू असल्याने ग्रामस्थांनी पुन्हा एकदा आंदोलन छेडले.

आंदोलनादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता विजय बागुल यांना पोलिसांच्या उपस्थितीत आंदोलनकर्त्यांसमोर आणण्यात आले. त्यावेळी त्यांनी ग्रामस्थांच्या मागण्या ऐकून घेत ३० जून २०२६ पर्यंत रस्ता वाहतुकीयोग्य करण्याचे लेखी आश्वासन दिले. यावेळी बोलताना उपअभियंता विजय बागुल यांनी सांगितले की, एकूण ९ किलोमीटर रस्त्यापैकी सुमारे ७ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. सध्या सुमारे ५५० मीटर भागात ग्रेड-१, ग्रेड-२ आणि एमपीएमचे काम सुरू असून उर्वरित २ किलोमीटर रस्त्याचे काम ३० जूनपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच पावसाळ्यानंतर संपूर्ण रस्त्याचे अंतिम डांबरीकरण करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या आंदोलनात प्रमुख मार्गदर्शक प्रकाश विचारे यांच्यासह खांबेरे सरपंच अतिश मोरे, अनिल साळावकर, शंकर दिवकर, अशोक सानप, संजय गोरिवले, मजिद भुरे आणि अन्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विशेष म्हणजे ठाकूर समाजातील आदिवासी महिलांची मोठी उपस्थिती आंदोलनाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरली.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते मागे घेण्यात आले असले तरी, ३० जूनपर्यंत रस्ता वाहतुकीयोग्य न झाल्यास अधिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. त्यामुळे आता प्रशासन आणि ठेकेदार यांच्यासमोर दिलेले आश्वासन वेळेत पूर्ण करण्याचे मोठे आवाहन उभे राहिले आहे.

वारंवार आश्वासने देऊनही रस्त्याचे काम वेळेत पूर्ण होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. यावेळी आंदोलनकर्त्यांनी आश्वासन नव्हे, काम हवे, अशी भूमिका घेत प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला. ३० जूननंतरही काम अपूर्ण राहिल्यास पुन्हा उग्र आंदोलन उभारण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.

## शालेय गणवेशाची होणार तपासणी

आहेत. कमी प्रतीच्या कापडामुळे विद्यार्थ्यांना त्रास होतो, गरम होते. त्यामुळे हे गणवेश आरामदायक नसतात. शालेय शिक्षण विभागातर्फे निधी दिला जात असताना गणवेश पुरवठादारांनी त्यातूनही पैसे वाचवून हलक्या प्रतीचे कापड वापरणे, ही फसवणूक आहे. त्यावर चाप लावण्यासाठी यंदा राज्यातील विविध भागांमधील गणवेशांची तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## पवनराजे प्रकरणाचा शनिवारी निकाल

अन्य आरोपींना त्यावेळी उपस्थित राहण्याचे आदेश दिले. मागील महिन्यातील सुनावणीच्या वेळी पाटील यांच्यासह आणखी एक आरोपी आरोग्य अस्वास्थ्याच्या कारणास्तव सुनावणीला अनुपस्थित होते. त्यावेळी, निकाल मंगळवारी (दि.१६) देण्याचे विशेष न्यायालयाने स्पष्ट केले होते व सर्व आरोपींना न चुकता सुनावणीला उपस्थित राहण्याचे बजावले होते. धाराशिवचे विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकरांचे वडील पवनराजे निंबाळकर व त्यांच्या गाडी चालकाची वीस वर्षांपूर्वी हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह नऊ जणांविरोधात खटला चालवण्यात आला.

## मिसिंग लिंक पुलावर अपघात

गाडीवर आदळली. यानंतर वेरना गाडीने आणखी एका कारला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की, तिनही गाड्यांचे मोठ्या प्रम णात नुकसान झाले. मात्र प्रवाशांनी सीट बेल्ट लावले असल्याने आणि गाडीतील एअर बॅग्ज उघडल्याने, सर्वजण बचावले. अपघाताची माहिती मिळताच, महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा, बोरघाटचे अधिकारी व कर्मचारी तसेच संबंधित यंत्रणांचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तात्काळ मदतकार्य हाती घेत अपघातग्रस्त वाहने क्रेनच्या सहाय्याने रस्त्याच्या बाजूला हलवली. या घटनेमुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला होता. मात्र यंत्रणांच्या तत्पर कार्यवाहीमुळे वाहतूक लवकरच सुरळीत करण्यात आली. महामार्गावर वाहन चालविताना सुरक्षित अंतर राखणे, अचानक ब्रेक न मारणे आणि वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे आवाहन महामार्ग पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## अशक्यप्राय गोष्ट शक्य करून दाखवली

शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामस्थ आणि पालक यांचेही मोठे योगदान आहे. मात्र जिजाबाई वारंजे आणि प्रतिभा भोसले यांच्या अथक परिश्रमामुळेच हे परिवर्तन शक्य झाल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. एका शिक्षिकेच्या नावातच स्त्रीशक्तीचे सामर्थ्य दडलेले आहे, तर दुसरीच्या आडनावात मराठी इतिहासाचा गौरवशाली वारसा आहे. या जिजाबाई-भोसले जोडगोळीने अक्षरशः अशक्यप्राय वाटणारे लक्ष्य गाठून दाखवले आहे. शाळेतील मावशी मेघा ठाकूर यांच्या समर्पणाचाही विशेष उल्लेख करावा लागेल.

शाळेत केवळ एक-दोन विद्यार्थी असतानाही पोषण आहाराच्या कामासाठी अत्यल्प, अवघ्या एक ते सव्वा रुपयांच्या मोबदल्यावर त्यांनी जबाबदारी पार पाडली. विद्यार्थी कमी आहेत म्हणून काम करायचे नाही, अशी भूमिका त्यांनी कधीही घेतली नाही. उलट शाळेशी असलेली आपुलकी आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी जपत त्यांनी निःस्वार्थपणे सेवा बजावली. त्यांच्या या जिद्दीला आणि समर्पणालाही तितकाच सलाम केला जात आहे. आज उंबर्डे जिल्हा परिषद शाळेची ही यशोगाथा केवळ विद्यार्थी पटवाढीची कथा नसून, जिद्द, चिकाटी, लोकसहभाग आणि शिक्षणावरील विश्वास यांचे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे. शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रत्येकासाठी ही घटना मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरणारी आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांनी मौजे-कांदाट, ता.महाबळेश्वर, जि.सातारा येथील श्रीमती. गीता आनंद मोरे- वगैरे, रा.वरळी, मुंबई यांच्या खुद्द मालकीच्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे- कांदाट, ता. महाबळेश्वर, जि. सातारा येथील,**
**१) गट क्रमांक व उपविभाग - ४५/१, क्षेत्र १८८-३२-०० हे. आर, आकार रु. ५८.५० पैसे, व**
**२) गट क्रमांक व उपविभाग - ४४, क्षेत्र १७५-२२-०० हे. आर, आकार.रु.५४.०० पैसे., या मिळकती मधील अविभक्त हिस्सा.**

तरी वर वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालकांचे ताबे कब्जा वहिवाटीत, निर्वेध, बोजा विरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीसंदर्भात कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे आत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही हरकत न आल्यास माझे अशील त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग सही/-
दिनांक :- १७/०६/२०२६ **ॲड. समाधान रविंद्र पाटील**
मु.पो. वेश्वी, अलिबाग - रायगड
मोबा. नं. ८९८३०११९६९

### अलिबाग नगरपरिषद
**जाहीर फेर निविदा सुचना**

अलिबाग नगरपरिषद महिला व बाल कल्याण अंतर्गत अलिबाग नगरपरिषद हद्दितील महिलांना व मुलींना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे करिता मान्यता प्राप्त/नोंदणीकृत (एनजीओ) संस्थाकडुन खालील प्रमाणे फेर निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कोरी फेर निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम | फेर निविदा फॉर्म मिळणेची तारीख वेळ | सिलबंद फेर निविदा सादर करणेची अंतिम तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | महिलांना व मुलींना स्वयंरोजगारसाठी ब्युटी पार्लरचे व्यावसायिक प्रशिक्षण देणे. | रु.२००/- | रु. २०००/ | १८/०६/२०२६ ते २५/०६/२०२६ (कार्यालयीन वेळेत) | २५/०६/२०२६ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत |
| २ | महिलांना व मुलींना स्वयंरोजगारसाठी केक बेकरी प्रोडक्ट्स बनविण्याचे व्यावसायिक प्रशिक्षण देणे. | रु.२००/- | २०००/ | १८/०६/२०२६ ते २५/०६/२०२६ (कार्यालयीन वेळेत) | २५/०६/२०२६ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत |
| ३ | महिलांना व मुलींना स्वयंरोजगारसाठी चॉकलेट बुके बनविण्याचे व्यावसायिक प्रशिक्षण देणे. इत्यादी | रु.२००/- | २०००/ | १८/०६/२०२६ ते २५/०६/२०२६ (कार्यालयीन वेळेत) | २५/०६/२०२६ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत |

**सुचना :** १) फेर निविदा फॉर्म व फेर निविदेबाबतची अधिक माहिती कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) महिला व बालकल्याण विभागात मिळेल.
२) फेर निविदा द्विलिफाफा पद्धतीने सादर करण्याचे असून लिफाफा नं.१ मध्ये पात्रते याबाबतची कागदपत्र व लिफाफा नं.२ मध्ये वित्तीय बोलिचा फॉर्म सादर करण्याचा आहे. दोन्ही लिफाफ्यावर कामाचे नांव व लिफाफा नंबर नमुद करावा.
३) राष्ट्रीयकृत बँकांकडील धनाकर्षाने इसारा रक्कम भरण्यांत यावी व धनाकर्ष स्वतंत्र लिफाफ्यात फेर निविदेसोबत सादर करावा.
४) फेर निविदेबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती निविदा फॉर्म मध्ये देण्यांत आलेल्या आहेत.

सही/-
**(सागर साळुंखे)**
**मुख्याधिकारी**
**अलिबाग नगरपरिषद**

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
**निविदा सूचना**

बँकेची सन २०२५-२०२६ सालाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ११.०७.२०२६ रोजी आयोजित करणेत आलेली आहे. या वार्षिक सर्वसाधारण सभेकरीता सुमारे १५०० ते २००० नाश्ता पॅकेट्स बँकेला खरेदी करावयाचे आहेत. नाश्ता पॅकेट्स खरेदी करणेकरीता हॉटेल मालक/कॅटरर्स यांचेकडून दर पत्रकासह निविदा मागविणेत येत आहेत.

तरी ज्या निविदा धारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत. त्यांनी आपल्या निविदा दिनांक २४.०६.२०२६ पर्यंत खाली सही करणारे यांचे नावाने सादर कराव्यात. रायगड जिल्ह्यातील निविदाधारकांना प्राधान्य देणेत येईल.

एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार बँकेचे संचालक मंडळ राखून ठेवीत आहे. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल. याबाबतची अधिक माहिती केंद्र कार्यालय अलिबाग येथे मिळेल.

केंद्र कार्यालय अलिबाग सही/-
दिनांक : १८.०६.२०२६ **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

### रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
**निविदा सूचना**

बँकेची सन २०२५-२०२६ सालाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ११.०७.२०२६ रोजी आयोजित करणेत आलेली आहे. या वार्षिक सर्वसाधारण सभेकरीता सुमारे १५०० ते २००० भेटवस्तू खरेदी करणेकरीता सप्लायर्स/विक्रेते यांचेकडून तपशिल व भेटवस्तूंच्या दरासह निविदा मागविणेत येत आहेत.

तरी ज्या निविदा धारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत. त्यांनी आपल्या निविदा दिनांक २४.०६.२०२६ पर्यंत खाली सही करणारे यांचे नावाने सादर कराव्यात. रायगड जिल्ह्यातील निविदाधारकांना प्राधान्य देणेत येईल.

एक किंवा सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार बँकेचे संचालक मंडळ राखून ठेवीत आहे. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल. याबाबतची अधिक माहिती केंद्र कार्यालय अलिबाग येथे मिळेल.

केंद्र कार्यालय अलिबाग सही/-
दिनांक : १८.०६.२०२६ **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

### जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे कार्ले, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.३२६, क्षेत्र ०.२०.८० (हे.आर.), पो. ख.०.२४.०० (हे.आर.), एकूण क्षेत्र ०.४४.८० (हे.आर.), आकार ४.१९ (रु.पैसे) या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.जयवंत धोंडू भगत, श्री.प्रमोद धोंडू भगत, श्री.भरत धोंडू भगत, श्री.प्रदिप धोंडू भगत, श्रीमती. सुरेखा कृष्णा कवळे, सर्व रा.कार्ले, पो.खंडाळे, ता.अलिबाग, जि.रायगड यांजकडुन जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे आशीलांनी विकत घेण्याबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विद्यमान मालकांबरोबर खरेदीखत पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- १८/०६/२०२६. **(ॲड.परेश एम.घरत )**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस.टी.स्टँड जवळ, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड
९८५०४८१२३४

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
## १ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
## दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# उरणमध्ये रुग्णांच्या खिशावर दरोडा?

## 'आरोग्य रॅकेट'वर मुंडेंचा हातोडा कधी?

### तालुक्यात आरोग्य सेवांची मनमानी

| उरण | प्रतिनिधी |

राज्यातील भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि माजलेल्या अधिकाऱ्यांना धडा शिकविणारे आयुक्त तुकाराम मुंडे यांचा धाक अनेक विभागांवर बसला आहे. त्यामुळे अनेकांचे धाबे दणाणले असून, अनेकांच्या फायली उघडल्या गेल्या आहेत. परंतु, उरणमध्ये मात्र काही दवाखाने, मेडिकल आणि पॅथॉलॉजी केंद्रांचा माज प्रचंड वाढला आहे. त्यांनी कायदा, नियम आणि शासन यांना तिलांजलीच दिली असल्याचे स्थानिकांमधून बोलले जात आहे. त्यामुळे उरणमधील 'आरोग्य रॅकेट'वर मुंडेंचा हातोडा कधी पडणार, असा प्रश्न स्थानिकांमधून उपस्थित केला जात आहे.

उरण तालुका तिसऱ्या मुंबईत गणला जात आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकास कामे सुरू आहेत. तसेच, या ठिकाणी औद्योगीक क्षेत्रही मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे उरणमधील लोकसंख्या देखील वाढत आहे. असे असतानाही सर्वसामान्य जनतेला आपले आरोग्य जपण्यासाठी मोठे हाल सोसावे लागत आहे. सध्या उरणमधून रुग्ण आजाराने त्रस्त होऊन दवाखान्यात जातो आणि बाहेर पडताना मात्र बिलाचा आकडा पाहून दुसऱ्यांदा आजारी पडतो, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे उरणमध्ये आरोग्यसेवेच्या नावाखाली रुग्णांच्या खिशावर दरोडा टाकला जात आहे का, हा प्रश्न आता सर्वसामान्य जनतेच्या तोंडी आला आहे. तसेच, तालुक्यात अनेक ठिकाणी बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट असल्याची चर्चा देखील वर्षानुवर्षे सुरू आहे. काही ठिकाणी वैद्यकीय पात्रता, नोंदणी आणि परवान्यांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. येथील मेडिकल स्टोअर्समध्ये डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषध विक्री होत असल्याच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. काही ठिकाणी रुग्णाला थेट विशिष्ट मेडिकलमधूनच औषधे घेण्यासाठी भाग पाडले जाते. तसेच, पॅथॉलॉजी केंद्रांचा कारभार तर आणखी गंभीर असल्याची चर्चा आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, अनेक दवाखाने निवासी इमारतींमध्येच थाटले गेल्याची चर्चा आहे. त्याठिकाणी सोसायटीची परवानगी, अग्निसुरक्षा प्रमाणपत्र, रुग्णांसाठी सुरक्षित प्रवेश, आपत्कालीन परिस्थितीत जीव वाचविण्याची व्यवस्था या सर्वांची तपासणी कोणी केली आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. काही ठिकाणी तर रुग्णांना दाखल करण्यासाठी बनवलेल्या खोल्या पाहिल्यानंतर हे दवाखाने आहेत की कोंबड्यांची खुराडी, असा प्रश्न पडतो. येथील खाटा एकमेकांना चिकटलेल्या, स्वच्छतेचा बोजवारा, प्रशिक्षित नर्सिंग स्टाफचा अभाव आणि अवाढव्य बिले हा अनेक ठिकाणचा वास्तव असल्याचे बोलले जात आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, काही दवाखाने आणि मेडिकल यांच्यातील कथित साटेलोट्याची चर्चा सुरु आहे. डॉक्टर स्वतःच्या किंवा नातेवाईकांच्या नावावर मेडिकल चालवतात का? रुग्णांना विशिष्ट ठिकाणीच औषधे घेण्यास भाग पाडले जाते का? औषधांच्या किंमतींमध्ये फरक का असतो? अशी प्रश्ने स्थानिकांमधून उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे या सर्व प्रकारांवर प्रसारमाध्यमांनी वारंवार प्रकाशझोत टाकला आहे. स्थानिक नागरिकांनी देखील तक्रारी केल्या आहेत. मात्र, संबंधित शासकीय यंत्रणा मात्र शांतता पाळून आहे. ही शांतता निष्क्रियतेची आहे की आर्थिक साटेलोट्याची, असा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे. त्यामुळे आरोग्य विभाग आणि संबंधित यंत्रणांना हे सर्व दिसत असूनही याकडे जाणीपूर्वक डोळेझाक केली जात आहे. या ठिकाणी पैशांचा व्यवहार आणि रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याच्या संतप्त



प्रतिक्रीया उरणकरांमधून उमटत आहेत. दरम्यान, आयुक्त तुकाराम मुंडे यांनीउरणमध्ये एकदा धाड टाकवी. या ठिकाणी आरोग्यसेवेच्या नावाखाली नेमके कोणाचे उखळ पांढरे होत आहेत आणि रुग्णसेवेच्या नावाखाली

#### अचानक मोहीम राबविण्याची मागणी

नुकतेच आयुक्त तुकाराम मुंडे यांनी रुग्णांच्या नातेवाईकांना कोणत्याही मेडिकलमधून औषधे खरेदी करण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट करताच काही मंडळींच्या चेहऱ्यावरील रंग उडाल्याची चर्चा आहे. कारण अनेक वर्षे सुरू असलेल्या कथित आर्थिक साखळ्यांवर हा निर्णय घाव ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उरणमधील दवाखाने, मेडिकल आणि पॅथॉलॉजी केंद्रांवर अचानक संयुक्त तपासणी मोहीम राबविली तर अनेक धक्कादायक प्रकार बाहेर येतील, असा विश्वास नागरिक व्यक्त करीत आहेत.

कशी पैशांची लूट होत आहे, हे वास्तव सर्वसामान्यांसमोर येईल. अशी प्रतिक्रीया उरणकरांमधून उमटत आहे.

## हक्काच्या पाण्यावर माफियांचा दरोडा

| उरण | प्रतिनिधी |

उरणमध्ये एकीकडे सर्वसामान्य नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी हंडे-बादल्या घेऊन रांगेत उभे राहावे लागत आहे, महिलांची पाण्यासाठी वणवण सुरू आहे, अनेक गावांमध्ये आणि शहरातील भागांमध्ये तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे; तर, दुसरीकडे पाणीमाफियांनी थेट जनतेच्या हक्काच्या पाण्यावरच दरोडा टाकल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. मुख्य जलवाहिन्यांवर बेकायदेशीर टॅब मारून हजारो लिटर पाण्याची चोरी केली जात आहे. त्याच पाण्यावर मिनरल वॉटर प्लांट, अनधिकृत सर्व्हिस सेंटर, टँकर माफिया, हॉटेल व्यावसायिक आणि इतर व्यावसायिक आपला लाखोंचा गल्ला भरत असल्याची जोरदार चर्चा रंगली आहे. या प्रकाराविरोधात उरण तालुका मराठी पत्रकार संघाने जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एमआयडीसी प्रशासन आणि संबंधित विभागांकडे अधिकृत तक्रार दाखल करून चौकशीची मागणी केली आहे.

## निवडक

### अनंत घरत यांचे निधन

**अलिबाग :** चौल-पिरांचे देऊळ येथील निवृत्त पोलीस अधिकारी अनंत तुकाराम घरत (९४) यांचे नुकतेच वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, जावई,नातवंडे, परतंवडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्काराच्यावेळी रायगड पोलीस दलाच्यावतीने मानवंदना देण्यात आली. तसेच, पुष्पचक्रही अर्पण करण्यात आले. घरत यांचे दशक्रिया विधी मंगळवारी (दि.२३) पिरांचे देऊळ येथे तर दिवसकार्य शुक्रवारी (दि.२६) राहत्या घरी होणार असल्याचे घरत कुटुंबियाकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, विविधक्षेत्रातील मान्यवरांनी घरत परिवाराचे सांत्वन केले.



### खांदेश्वर येथून व्यक्ती बेपत्ता

**पनवेल :** खांदेश्वर रेल्वे स्थानकातून चालत्या ट्रेनमधून उतरुन एक व्यक्ती कुठेतरी निघून गेला तो अद्याप घरी परतला नाही. त्यामुळे तो हरविल्याची तक्रार पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. विशाल कुमार खांडेकर (३३) असे या व्यक्तीचे नाव असून उंची ५ फुट ४ इंच, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, रंगाने गोरा, नाक सरळ, केस काळे असून, अंगात निळ्या रंगाचा हाफ शर्ट व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे. तसेच, अंगावर पांढऱ्या रंगाचे डाग (कोड) असून ही व्यक्ती मानसिक रुग्ण आहे. या व्यक्तिबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### टीप देण्याच्या कारणावरून मारहाण

**पनवेल :** वेटरला टीप देण्याच्या कारणावरून बांबू डोक्यात मारून जखमी केल्याप्रकरणी महेंद्र शेट्टी आणि हॉटेलमधील तीन ते चार वेटर यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रथमेश पवार हा कामोठे सेक्टर २४ येथे राहत असून तो त्याच्या मित्रांसोबत दारू पिण्यासाठी कोळखे येथील वेलवेट हॉटेल येथे गेला होता. यावेळी वेटरला टीप देण्याच्या कारणावरून वेटर आणि त्यांच्यामध्ये वाद झाला. यावेळी महेंद्र शेट्टी आणि हॉटेलमधील तीन ते चार वेटर यांनी प्रथमेश याच्या डोक्यात बांबूची झोड टाकून लाथाबुक्क्याने मारहाण करून शिवीगाळ केली. यावेळी प्रथमेशच्या गळ्यातील सोन्याची चेन तुटून देखील नुकसान झाले.

### नोकरीचे अमिष दाखवून फसवणूक

**पनवेल :** नोकरीच्या बहाण्याने १ लाख ७३ लाख ८१ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी आठ जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, दि.२८ मे ते जूनपर्यंत खारघर सेक्टर ७ येथील पंकज सिंग (२३) याला आठ आरोपींनी शिपिंग कंपनीमध्ये नोकरी लावून देण्याचे आमिष दाखविण्यात आले. त्यानंतर तोतया कंपनीतील मालक आणि स्टाफ यांनी पंकजसह इतर ७५ मुलांकडून १ कोटी ७३ लाख ८१ हजार रुपये स्वीकारले. परंतु, कोणालाही नोकरीला लावले नसून सर्वांची फसवणूक केली. या प्रकरणी अंजली वर्मा, सत्यम वर्मा, अनुज सिंग, बादल रॉय, विकास रॉय, कशिश, रीना, माधुरी यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दरवाजाचे कुलूप तोडून चोरी

**पनवेल :** घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरांनी १९ लाख ६५ हजार रुपये किमतीचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केल्याची घटना घडली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार या नवीन पनवेल सेक्टर १९ येथील साई शांती भवन येथील रहिवासी आहेत. त्यांच्याच इमारतीमध्ये राहत असलेला त्यांचा भाचा यांच्याकडे रात्री झोपण्यास गेला होता. यादरम्यान, चोरांनी त्यांच्या दरवाजाचे कुलूप तोडले आणि बेडरूम मधील १९ लाख ६५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

### रासायनिक प्रक्रियेमुळे पिवळसर पाणी

**नवीन पनवेल :** नवी मुंबई शहरात येणारे पिवळसर पाणी हे रासायनिक प्रक्रियेमुळे येत होते. त्यामुळे गेल्या काही दिवसांत महापौर सुजाता पाटील आणि अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांनी पिवळी माती मिसळल्यामुळे पाणी पिवळे होत असल्याचा दावा खोटा ठरला, असे नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी सांगितले. ते नवी मुंबई महानगरपालिका मुखालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

## रखडलेल्या रस्त्याच्या कामाला सुरुवात

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान शहरातील क्ले पेव्हर ब्लॉक लावून रस्ते करण्याचे काम सुरू होते. मात्र, आश्वपाल संघटनेच्या याचिकेनंतर फेब्रुवारी २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात माथेरान शहरातील सुरू असलेली विविध ११ रस्त्यांची कामे स्थगित ठेवण्याचे आदेश होते. तेव्हापासून बंद असलेले रस्त्यांची कामे पुन्हा सुरू करण्याचे आदेश न्यायालयाने डिसेंबर २०२५ मध्ये दिले होते. मात्र, नगरपरिषद प्रशासनाकडून ती कामे सुरू करण्यात आली नव्हती. अखेर महात्मा गांधी रस्ता ते छत्रपती शिवाजी महाराज रोड या रस्त्याच्या अपूर्ण कामाला सुरुवात करण्यात



आली आहे.

माथेरान मधील धूळ विरहित रस्त्यांबाबत स्थानिक अश्वपाल संघटना, मूलनिवासी अश्वपाल संघटना तसेच अन्य दोन संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात पिटिशन दाखल केले आहे. पिटिशन दाखल करून घेताना सर्वोच्च न्यायालयाने २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी माथेरान मधील सर्व रस्त्यांची कामे पुढील दोन महिने थांबवण्यात यावीत, असा निर्णय दिला होता. त्यानंतर लगेचच शहरातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून दस्तुरी ते छत्रपती शिवाजी महाराज चौक हा साडेचार किलोमीटर लांबीचा महात्मा गांधी रस्ता, तसेच माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेच्या माध्यमातून कामाचे कार्यादेश देण्यात आलेले आणि काही कामे सुरु असलेले असे ११ रस्त्यांची धूळ विरहित रस्त्यात रूपांतर करण्याची कामे थांबवण्यात आली होती. या रस्त्यांवर क्ले पेव्हर लावले जात होते. त्यानंतर माथेरान नगरपरिषदेच्या मागणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने या सर्व रस्त्यांचे धूळ विरहित रस्त्यात रूपांतर करण्याचे आदेश दिले होते. परंतु, त्या आदेशानंतर अनेक महिने उलटले तरी रस्त्यांची कामे सुरू होत नव्हती. अखेर मंगळवारी (दि.१६) माथेरान शहरातील मुख्य रस्ता असलेल्या महात्मा गांधी रोडवरील वाचनालय ते छत्रपती शिवाजी महाराज रोड या भागातील रस्त्याच्या कामाचा शुभारंभ नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या उपस्थित करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष संतोष शेलार, विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते.

## पावसाळ्यात काशिद समुद्रकिनारा बंद




| कोर्लई | प्रतिनिधी |

पर्यटनात प्रसिद्ध असलेला मुरुड तालुक्यातील काशिद समुद्रकिनारा पावसाळ्यात पुढील दोन महिन्यांसाठी बंद करण्यात आला आहे. तसेच, सुरक्षेचा उपाय म्हणून काशीद रस्त्यालगत सुचना फलक देखील लावण्यात आले आहेत. त्यामुळे पर्यटकांनी सुचनांचे पालन करुन समुद्रात जाऊ नये, असे आवाहन ग्रामपंचायत, ग्रामस्थ, स्टॉलधारक, मुरुड पोलीस निरीक्षक यांच्यावतीने करण्यात आले आहे. तसेच, दरवर्षीप्रमाणे यंदाही काशिद समुद्रकिनाऱ्यावरील विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स दि.१६ जून ते १४ ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्यात आले आहेत. याठिकाणी असलेल्या स्पिडबोट, बनाना बोट, पॅरोसेलिंग बोट मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातच बंद करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पर्यटकांचा काहीसा हिरमोड देखील होणार आहे.

## बस वाहकाचा प्रामाणिकपणा

### पैशांनी भरलेली पर्स केली परत

| अलिबाग | प्रतिनिधी |

माणगाव येथील रसिका शिंदे आणि वैशाली शिंदे या दोघी महाड-मुरुड या बसमधून प्रवास करत होत्या. त्या रेवदंडा येथे उतरल्यानंतर त्यांना आपली पैशांनी भरलेली पर्स बसमध्येच विसरल्याचे लक्षात आले. त्या पर्समध्ये सुमारे साडेपाच हजार रुपये रोख रक्कम, आधारकार्ड, पॅनकार्ड, एटीएमकार्डसह महत्त्वाची कागदपत्रे होती. त्यानंतर रसिका शिंदे यांनी राकेश काठे यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण प्रकार सांगितला. त्यानंतर राकेश काठे यांनी बोर्ली येथे राहणाऱ्या आपल्या मित्राशी संपर्क साधला आणि संबंधित बस मुरुडहून बोर्लीकडे जात असताना ती थांबवून बसचे वाहक कैलास इंगळे यांच्याकडे पर्सबाबत चौकशी केली.कैलास इंगळे यांनी तत्परता दाखवत संबंधित पर्स सुरक्षित असल्याचे सांगितले. पर्सची ओळख पटवल्यानंतर त्यांनी ती सर्व साहित्यांसह सुखरूप परत केली. रोख रक्कम व महत्त्वाची कागदपत्रे अबाधित अवस्थेत मिळाल्याने शिंदे कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला.



## ट्रिपल तलाक प्रकरणी गुन्हा

| पनवेल | प्रतिनिधी |

ट्रिपल तलाक प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नोव्हेंबरमध्ये खारघर सेक्टर १२ या ठिकाणी पीडित महिलेला पतीने तीन वेळा तलाक असे म्हणत ट्रिपल तलाक दिला आणि वडिलांकडून सतत पैसे घेऊन येण्यासाठी दबाव टाकून मानसिक त्रास दिला. त्यांच्या सासऱ्याने लज्जास्पद वर्तन करून सासूने पीडितेला शिवीगाळ आणि मारहाण केली. या प्रकरणी पीडित महिलेचे पती, सासू-सासरे मोठे दिर यांच्याविरोधात त्रास दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## विद्यार्थ्यांच्या पालकांना घरपट्टीत सवलत

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतीने स्तुत्य उपक्रम राबवला आहे. येथील जिल्हा परिषद शाळेत पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या घरपट्टीमध्ये ५० टक्के सवलत देणार असल्याचे ग्रामपंचायतीने जाहीर केले आहे. दरम्यान, चिंध्रण येथील जि.प. शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मिरवणूक काढून, फुलांचा वर्षाव करत आणि पावलांचे ठसे घेऊन या विद्यार्थ्यांचा ज्ञानमंदिरात प्रवेश सोहळा मोठ्या आनंदात



पार पडला. यावेळी चिंध्रणचे सरपंच एकनाथ पाटील, उपसरपंच मनोज कुंभारकर, सदस्य जीवन पाडेकर, ग्रामविकास अधिकारी ईश्वर पवार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जागृती पाटील, उपाध्यक्ष राम पाटील, शाळेचे मुख्याध्यापक जाधव, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह पालकवर्ग आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यादरम्यान, पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना घरपट्टीमध्ये ५० टक्के सवलत देण्याचे सरपंच एकनाथ नामदेव पाटील यांनी जाहिर केले.

## घरफोडीत लाखोंचे दागिने चोरले

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील सांगडे येथील घरात प्रवेश करून चोरांनी ४ लाख ५ हजार रुपयांचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण काशिनाथ पाटील हे सांगडे येथे राहत असून त्यांच्या घराचे कुलूप तोडून चोरांनी घरात प्रवेश केला. त्यानंतर चोट्यांन बेडरूममधील लोखंडी कपड्याचे लॉक तोडून आतील दागिने आणि रोख रक्कम लंपास केली.

## 'कर्जमाफीतील त्रुटी दूर करा'

| पेण | प्रतिनिधी |

शिवसेना ठाकरे गटाच्या शिष्टमंडळाने प्रांत अधिकारी प्रवीण पवार यांना निवेदन दिले. त्यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेमधील त्रुटी दूर करून सर्वसमावेशक कर्जमाफी लागू करावी, तसेच खारबंदिस्ती फुटून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, अवकाळीपाऊस,दुष्काळ,पूरस्थिती, वाढता उत्पादन खर्च, अपुरा हमीभाव आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे कर्जमाफीसाठी निश्चित केलेली कट-ऑफ तारीख रद्द करावी,



कर्जमाफीची मर्यादा दोन लाखांवरून वाढवून संपूर्ण कर्जमाफीचा विचार करावा आणि कोणताही भेदभाव न करता सर्व पात्र शेतकऱ्यांचा योजनेत समावेश करावा, अशी मागणी केली आहे. रायगड जिल्ह्यातील खारबंदिस्ती फुटल्याने समुद्राचे खारे पाणी शेतीत शिरून हजारो एकर जमीन नापीक झाली आहे. या नुकसानीसाठी शासनाने तातडीने पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी. खारबंदिस्तीची दुरुस्ती व कायमस्वरूपी संरक्षणासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे. तसेच, शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलनाचा इशारा शिवसेना ठाकरे गटाकडून देण्यात आला आहे.

## स्मार्ट मीटर सक्ती विरोधात मोर्चा



| पेण | प्रतिनिधी |

जिल्ह्यातील वीज ग्राहकांच्या विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (ठाकरे गट) पक्षाच्यावतीने महावितरणच्या रायगड परिमंडळ कार्यालयाकडे निवेदन सादर केले आहे. या निवेदनात अवाजवी वीज बिले, स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती, वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा तसेच ग्राहकांच्या वेगवेगळ्या तक्रारींचे वेळेत निराकरण होत नसल्याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, महावितरणने नागरिकांच्या या प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास जनतेसोबत तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ठाकरे गटाने दिला आहे. यावेळी जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, तालुका प्रमुख समिर म्हात्रे, अविनाश म्हात्रे, नरेंद्र गावंड, चेतन मोकल, योगेश पाटील, सुलतान साठी उपस्थित होते.

### चाऱ्याच्या अभावामुळे गुरांची फरपट | जनावरांच्या आरोग्यावर घातक परिणाम

## मोकाट गुरांना उकिरड्याचा आधार

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

जुन महिन्याचा मध्य उलटला तरी अद्याप पाऊस अजून दाखल झालेला नाही. त्यामुळे उन्हाचा तडाखा सर्वत्रच अधिकच वाढला आहे. अशातच जनावरांसाठी हिरव्या व सुक्या चाऱ्याचा देखील अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे मोकाट जनावरांना खाण्यासाठी अन्न पाण्याची कमतरता भासू लागली आहे. त्यामुळे हि मोकाट गुरे पालीतील डम्पिंग ग्राऊंड व उकिरड्यावर जाऊन मिळेल ते अन्न खात आहेत. त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय स्वच्छतेचा प्रश्न देखील ऐरणीवर आला आहे.

पालीतील डम्पिंग ग्राऊंडवर तसेच जुने पोलीस स्थानक, मधली आळी, बल्लाळेश्वर मंदिर व बल्लाळेश्वर नगर या ठिकाणी असलेल्या उकिरड्यावर सकाळ पासूनच मुकाट गुरांची गर्दी असते. येथे टाकलेला कचरा ही गुरे अस्ताव्यस्त करतात, त्यामुळे येथे घाण व दुर्गंधी पसरते. त्यामुळे येथील नागरिकांसह गुरांचे आरोग्य देखील धोक्यात आले आहे. येथील डम्पिंग ग्राउंड व उकिरड्यावरील कचऱ्यात धातू



तसेच इंजेक्शनच्या सुयांसारख्या अनुकुचिदार घटक असतात. ते पोटात गेल्यामुळे जनावरांच्या जठराला व अन्ननलिकेला इजा पोहचते. तसेच, बऱ्याचवेळा या ठिकाणी टाकुन दिलेले अन्न पदार्थ पिशव्यांमध्ये असते. त्यातील बरेचसे अन्न सडलेले असते आणि ते त्या प्लास्टिकला चिकटतात. त्यामुळे त्या अन्नासोबत गुरांच्या पोटात कमी अधिक प्रमाणात प्लास्टिक देखील जाते. प्लास्टिकसह सडके आणि कुजलेले अन्न पदार्थ खाऊन या जनावरांच्या आरोग्यावर घातक परिणाम होतात. त्यांची पचनशक्ती मंदावते, तसेच अन्नाच्या शोधात सतत चालल्याने त्यांची ऊर्जा देखील कमी होऊन अशक्तपणा येतो. तसेच, सतत प्लास्टिक खाल्ल्यामुळे ते त्यांच्या पोटात साठते आणि त्यांचा मृत्यू देखील होतो. काही वेळेस अशा मेलेल्या गुरांची हाडे इतर गुरे आणि प्राणी चघळतात व पर्यायाने त्यांचा देखील मृत्यू होतो. हे दुष्टचक्र सुरूच राहते.

#### प्लास्टिक गुरांना धोकादायक

शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी आपली जनावरे मोकाट सोडू नये. त्यांना पेंढा किंवा सुके गवत खाऊ घालावे. कचऱ्यात किंवा उकिरड्यावर टाकलेले अन्न पदार्थ खाऊन गुरांची पचनक्रिया बिघडते. मानवी खाद्य हे जनावरांसाठी नाही. वारंवार प्लास्टिक पोटात गेल्याने ते पोटात साठून गुरांचा मृत्यू देखील होऊ शकतो. शहरी तसेच ग्रामीण भागात निसर्गपूरक जिवन अंगिकारणे गरजेचे आहे.

> **उष्म्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतकरी किंवा गुरेपालक यांनी आपली गुरे चरण्यासाठी मोकाट सोडू नयेत. मोकाट सोडलेल्या गुरांचे अपघात होऊन त्यांचा मृत्यू होतो, तसेच जखमी देखील होतात. शासनाने मोकाट गुरांच्या चारा पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. किंवा पशुपालकांना यासाठी अनुदान दिले पाहिजे.**
> **- केतन म्हसके, उपाध्यक्ष, शिवऋण प्रतिष्ठान व गो रक्षक**

# रस्ते अपघातांची चिंता

उन्हाळा जसजसा वाढतो तसतसे लोकांचे शहरांमधून आपापल्या गावांना जाण्याचे प्रमाण वाढते. रेल्वे वगैरे या गर्दीला पुरी पडू शकत नाही. मग लोक खासगी वाहन करतात. प्रवासखर्च वाचवण्यासाठी सात प्रवाशांच्या वाहनामध्ये १२-१३ लोक ठेचून भरले जातात. चालकाला झोप वगैरे न घेता वाहन पळवायला भाग पाडले जाते.त्याचा व्हायचा तोच परिणाम होतो. गाडीला अपघात होतो व माणसे मरतात. पावसाळ्यामध्ये रस्ते खराब असल्याने तर थंडीमध्ये दाट धुक्यामुळे अपघात घडतात. त्यातच भारतातील सर्वच प्रांतांमध्ये शहरांची आणि वाहनांची संख्या कमालीची वाढली आहे. त्या मानाने रस्ते मात्र वाढलेले नाहीत. गावातले असावेत असे अरुंद आणि खड्ड्यांचे रस्ते सर्वत्र आहेत. सर्वच शहरांमध्ये दुचाकीस्वार वाट्टेल तशी गाडी चालवतात. स्वतःचा व लोकांचाही जीव धोक्यात घालतात. यातून अनेक अमूल्य जीव हकनाक बळी जातात. वाहने, रस्ते इत्यादींचे करोडों रुपयांचे नुकसान होते. आकडेवारी कधी कधी भयावह असते. भारतात दरवर्षी सरासरी ५ लाख रस्ते अपघात घडतात, ज्यात सुमारे १.८ लाख जीवितांची हानी होते . दररोज सरासरी ४०० हून अधिक जण रस्ते अपघातात मृत्युमुखी पडतात, ही संख्या म्हणजे दररोज एक मोठी विमाने कोसळण्याइतकी भीषण आहे . विमान अपघातांमध्ये चौकशी समित्या, नियमांत बदल, तातडीने उपाययोजना करण्यात येतात, मात्र रस्ते अपघातांकडे मात्र नियमित, दैनंदिन घटना म्हणून पाहिले जाते. परंतु आकडे सांगतात की, २०२३ मध्ये झालेले सुमारे ५ लाख अपघात हे गेल्या १९ वर्षांतील सर्वाधिक आहेत. फक्त २% रस्ते असू-नही, राष्ट्रीय महामार्गांवर देशातील ३०% हून अधिक रस्ते अपघातातील मृत्यू होतात. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने लोकसभेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, २०२३ मध्ये राष्ट्रीय महामार्गांवर १,२३,९५५ अपघातांत ५३,६३० मृत्यू झाले, तर २०२४ मध्ये १,२५,८७३ अपघातांत ५३,०९० मृत्यू झाले . २०२५ च्या पहिल्या सहा महिन्यांतच ६७,९३३ अपघातांत २९,०१८ जणांचा मृत्यू झाला आहे, जो गेल्या वर्षभरातील एकूण मृत्यूंच्या निम्म्याहून अधिक आहे. २०२५ संपेपर्यंत हा आकडा २०२४ च्या उंबरठ्याला सहज ओलांडेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

### किशोरवयीनांचे मृत्यू

सर्वात चिंताजनक बाब म्हणजे अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी संसदेत सांगितले की, रस्ते अपघातातील ६६% मृत्यू हे १८ ते ३४ वयोगटातील तरुणांचे आहेत. हीच पिढी देशाचे भविष्य, देशाची ताकद असताना, रस्ते अपघात त्यांना काढून घेत आहेत. १८ वर्षांखालील मुलांची स्थितीही फारशी चांगली नाही. अभ्यासात असे आढळले आहे की, रस्ते अपघातातील एकूण मृत्यूंपैकी ८% हे १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुले आणि किशोरवयीन आहेत. अनेकदा अपघातांचे कारण 'चालकाची चूक' सांगितली जाते, पण प्रत्यक्षात यामागे अनेक दोष आहेत. केंद्रीय मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, जास्त वेग (ओव्हरस्पीडिंग) हे अपघाताचे सर्वात मोठे कारण आहे. २०२२ मध्ये राष्ट्रीय महामार्गांवर ओव्हरस्पीडिंगमुळेच सुमारे १,१०,००० अपघात झाले, ज्यात जवळपास ५०,००० जण मृत्युमुखी पडले . २००९ पासूनची आकडेवारी पाहिल्यास, ओव्हरस्पीडिंग हे ४५% अपघातांसाठी कारणीभूत असल्याचे दिसते. दारू पिऊन वाहन चालवणे आणि चुकीच्या दिशेने (वन-वे) वाहन चालवणे यांसारख्या कारणांमुळेही मोठ्या प्रमाणात अपघात होतात तज्ज्ञांच्या मते, ही फक्त चालकांची चूक नाही तर पायाभूत सुविधांचीही मोठी कमतरता आहे. भारताने जलद गतीने रस्ते आणि महामार्गांचा विस्तार केला, मात्र सुरक्षा मानकांकडे दुर्लक्ष झाले. खराब रस्ता डिझाइन, अपुरी चिन्हे (साइनेज), दर्जाहीन बांधकाम, विभाजकांचा अभाव, रस्त्यांवरील खड्डे, धोकादायक वळणे, पाण्याच्या काठावर संरक्षक भिंत नसणे, या सगळ्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढते. उदाहरणार्थ, २०२५ मध्ये हैदराबादजवळील चेवेल्ला येथे झालेल्या भीषण अपघातात खड्डा टाळण्याचा प्रयत्न करताना एका ट्रकने बसमध्ये धडक दिली. या ठिकाणी कोणतेही विभाजक, रस्त्यावरील दिवे किंवा चिन्हे नव्हती. गुजरातमधील वडोदरा-हालोल महामार्गावर झालेल्या दुर्घटनेत, फक्त दोनच लेन कार्यरत असल्याने रस्त्याच्या कडेला थांबलेल्या ट्रकला बसने जोरदार धडक दिली, यात सात जणांचा मृत्यू झाला.

### ड्रायव्हिंग लायसन्सच्या भानगडी

भारतात ड्रायव्हिंग लायसन्स मिळवण्यासाठी फक्त वाहन चालवण्याची क्षमता (स्कील टेस्ट) पाहिली जाते, सुरक्षित वाहन चालवण्याच्या सवयी, ज्ञान आणि नियमांची अंमलबजावणी करण्याची क्षमता तपासली जात नाही. वाहतूक नियमांची सक्ती करणारी यंत्रणाही कमकुवत आहे, त्यामुळे चुकीची दिशा, वेगमर्यादेचे उल्लंघन, दारू पिऊन गाडी चालवणे या सवयी सर्रास दिसतात. अपघातानंतर तातडीने उपचार मिळण्याची सुविधा देखील फारशी उपलब्ध नाही. एम्सच्या अभ्यासानुसार, वेळेवर वैद्यकीय उपचार मिळाले तर दरवर्षी सुमारे ५०,००० मृत्यू टाळता येऊ शकतात. सरकारने २०३० पर्यंत रस्ते अपघातातील मृत्यूचे प्रमाण निम्म्याने कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. 'राह-वीर' योजनेअंतर्गत अपघातग्रस्तांना रुग्णालयात पोहोचवणाऱ्यांना २५,००० रुपये आणि 'राह-वीर' ही पदवी देण्यात येते. तसेच, अपघातग्रस्तांना सुरुवातीच्या सात दिवसांसाठी दर अपघाताला १.५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचार देण्याची योजना आहे. सुमारे ७,००० ब्लॅक स्पॉट्स (अपघातप्रवण स्थळे) दुरुस्त करण्यात आली असून, यासाठी ४०,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शाळा-महाविद्यालयांमध्ये रस्ता सुरक्षा शिक्षणाचा अभ्यासक्रम समाविष्ट करण्याचा प्रस्ताव आहे. मात्र, आकडेवारी सांगते की, प्रयत्न असूनही अपघातांची संख्या वाढतेय. २००५ ते २०२३ या काळात रस्ते अपघात फक्त १०% वाढले, तर मृत्यूंची संख्या ८०% ने वाढली आहे. ही वाढ सूचित करते की अपघात अधिक प्राणघातक ठरत आहेत. वाहनांची संख्या, रस्त्यांची लांबी वाढली आहे, पण तिच्या बरोबरीने सुरक्षा व्यवस्था विकसित झाली नाही. अपघात ही केवळ 'दुर्घटना' न राहता, एक सुनियोजित अकार्यक्षमतेची शोकांतिका बनली आहे. जोपर्यंत पायाभूत सुविधा, कायदे, प्रशिक्षण, आणि सार्वजनिक जागरुकता या सगळ्यांमध्ये आमूलाग्र बदल होत नाही, तोपर्यंत भारतातील रस्ते अपघातांचा हा काळोख कायम राहील. हा केवळ सरकारचा नाही तर प्रत्येक नागरिकाचा प्रश्न आहे, कारण रस्त्यांवर जीव गमावणारी ही व्यक्ती आपलीच असते. प्रगत देशांच्या प्रगतीची खूण केवळ त्यांच्या श्रीमंती राहणीमानात, उंची दारु पिण्यात किंवा कपडे वापरण्यात नसते. त्या देशांमध्ये प्रत्येक माणसाच्या जिवाला प्रचंड किंमत दिली जाते. आपल्याकडे अपघातात दोनच माणसे मेली असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे मुंबई गोवा मार्गावर, किंवा खंडाळा घाटामध्ये पुन्हा पुन्हा तसेच अपघात होत राहतात. सरकार वा न्यायालयाकडून त्यांच्या अपराध्यांना कडक शिक्षा होत नाही. या प्रश्नांचा समग्र विचार करण्याची वेळ आली आहे.

## विचार

# महाविकास आघाडीच्या विश्वासार्हतेचा प्रश्न

***महाराष्ट्राच्या राजकारणातील सध्याच्या घडामोडी एक व्यापक चित्र दाखवतात. एका बाजूला सत्तेसाठी पक्षांतरांचे स्वागत करणारे राजकारण आहे, तर दुसऱ्या बाजूला संघर्षाची धार हरवलेले विरोधी राजकारण आहे. या दोन्ही प्रवृत्ती लोकशाहीसाठी दीर्घकालीन दृष्टीने हितावह मानता येणार नाहीत. कारण मजबूत लोकशाहीसाठी सत्ताधारी पक्ष जितका सक्षम हवा, तितकाच सक्षम आणि लढाऊ विरोधी पक्षही आवश्यक असतो.***



**भागा वरखडे**

विधान परिषद निवडणुकीतील बिनविरोध विजय, उमेदवारांचा अभाव आणि आयात नेत्यांना मिळालेले प्राधान्य या घटनांकडे केवळ तात्कालिक राजकीय घडामोडी म्हणून पाहता येणार नाही. त्या म हाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीत होत असलेल्या बदलांचे संकेत आहेत. या संकेतांचे गांभीर्याने विश्लेषण करणे आणि त्यातून योग्य धडे घेणे ही सर्वच पक्षांची जबाबदारी आहे. अन्यथा निवडणुका राहतील, निकालही लागतील; पण लोकशाहीतील खरी स्पर्धा आणि कार्यकर्त्यांच्या निष्ठेचे मूल्य हळूहळू कमी होत जाईल. लोकशाहीत निवडणूक ही केवळ जागा जिंकण्याची प्रक्रिया नसते, तर राजकीय पक्षांच्या आत्मविश्वासाची, संघटनशक्तीची आणि जनतेसमोर लढण्याच्या तयारीची कसोटी असते. विजय आणि पराभव हे निवडणुकीचे अपरिहार्य घटक असले, तरी लढण्यापूर्वीच शस्त्रे टाकण्याची मानसिकता कोणत्याही राजकीय आघाडीसाठी धोक्याची घंटा ठरते. महाराष्ट्र विधान परिषदेच्या अलीकडील निवडणुकीत घडलेल्या घटनांनी नेमका हाच प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आणला आहे. महायुतीचे सहा उमेदवार बिनविरोध निवडून येणे, अनेक जागांवर महाविकास आघाडीला उमेदवारच न मिळणे, वाट्याला आलेल्या जागांवरही राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या उमेदवारांनी माघार घेणे तसेच काँग्रेसच्या उमेदवारांनीही अचानक अर्ज मागे घेणे या घटनांनी महाविकास आघाडीतील राजकीय गांभीर्याबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले.

राजकारणात पराभव हा लज्जास्पद नसतो; परंतु स्पर्धेत उतरण्याची इच्छाच नसणे किंवा लढाईपूर्वीच विजयाची आशा सोडणे हे नक्कीच चिंतेचे लक्षण असते. निवडणूक लढवणे म्हणजे केवळ विजयासाठी प्रयत्न करणे नव्हे, तर आपल्या विचारांची, धोरणांची आणि राजकीय अस्तित्वाची नोंद करून देणे असते. अशा परिस्थितीत विरोधी पक्ष म्हणून जनतेसमोर पर्याय उभा करण्याची जबाबदारी असलेल्या महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनी अनेक ठिकाणी दाखवलेली उदासीनता ही केवळ निवडणुकीतील रणनीती म्हणून पाहता येणार नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही वर्षांमध्ये मोठी उलथापालथ झाली. शिवसेनेतील फूट, राष्ट्रवादी काँग्रेसमधील विभाजन आणि त्यानंतर बदललेली राजकीय समीकरणे यामुळे विरोधकांसमोर संघटना पुन्हा उभी करण्याचे आव्हान होते. अशा काळात प्रत्येक निवडणूक ही कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याची आणि जनतेशी संपर्क दृढ करण्याची संधी असते; मात्र विधान परिषद निवडणुकीत दहाहून अधिक ठिकाणी उमेदवार न देणे किंवा दिलेले उमेदवार मागे घेणे हा संदेश कार्यकर्त्यांपर्यंत आणि मतदारांपर्यंत नकारात्मक पद्धतीने पोहोचण्याची शक्यता अधिक आहे. महायुतीने या निवडणुकीमध्ये दाखवलेली संघटनात्मक ताकद आणि विरोधकांची विस्कळीत अवस्था यातील तफावत विशेष लक्षवेधी ठरते. सत्ताधारी आघाडीने केवळ निवडणूक व्यवस्थापनच केले नाही, तर अनेक जागांवर स्पर्धाच निर्माण होऊ दिली नाही. याउलट महाविकास आघाडीच्या घटक पक्षांमध्ये समन्वयाचा अभाव, स्थानिक पातळीवरील कमकुवत तयारी आणि निर्णय प्रक्रियेतील अनिश्चितता दिसून आली.

निवडणूक जिंकणे आणि निवडणूक लढणे यामध्ये मूलभूत फरक असतो. अनेकदा पराभव निश्चित दिसत असतानाही पक्ष उमेदवार उभा करतात, कारण राजकारणात उपस्थिती टिकवून ठेवणेही तितकेच महत्त्वाचे असते. विरोधी पक्षाची भूमिका केवळ सत्ताधाऱ्यांवर टीका करण्यापुरती मर्यादित नसते. जनतेसमोर सक्षम पर्याय निर्माण करणे, कार्यकर्त्यांना प्रेरणा देणे आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग ठेवणे ही त्यांची जबाबदारी असते. विरोधकांनीच निवडणूक प्रक्रियेकडे अनुत्साहाने पाहिले, तर लोकशाहीतील स्पर्धात्मकता कमी होण्याचा धोका निर्माण होतो. मतदारांना पर्याय उपलब्ध नसल्यास निवडणुकीचे महत्त्वही कमी होते. महाविकास आघाडीतील पक्षांमध्ये गेल्या काही काळापासून समन्वयाचा प्रश्न वारंवार समोर येत आहे. लोकसभा निवडणुकीत काही प्रमाणात एकत्रितपणे काम केल्याचे चित्र दिसले असले, तरी स्थानिक स्वराज्य संस्था, विधान परिषद आणि इतर निवडणुकांमध्ये मतभेद उघडपणे दिसून आले आहेत. जागावाटप, उमेदवारांची निवड, स्थानिक नेतृत्वातील संघर्ष आणि राजकीय प्राधान्यक्रम यांमधील विसंगतीमुळे आघाडीचे एकसंध चित्र निर्माण होताना दिसत नाही. याचा परिणाम निवडणुकीतील कामगिरीवर होणे स्वाभाविक आहे. विशेषतः काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाकडून अधिक आक्रमक भूमिका अपेक्षित असते. महाराष्ट्रात काँग्रेसची ऐतिहासिक परंपरा, संघटनात्मक जाळे आणि मतदारांमधील ओळख अजूनही अस्तित्वात आहे. अशा परिस्थितीत उमेदवारांनी अचानक माघार घेणे किंवा अनेक जागांवर प्रभावी लढत न उभारणे हे पक्षाच्या दीर्घकालीन राजकीय धोरणाबाबत प्रश्न निर्माण करते.

विरोधी राजकारणात सातत्य आणि संघर्षशीलता या दोन गुणांना विशेष महत्त्व असते. तेच गुण कमी पडताना दिसल्यास जनतेचा विश्वास ढळू शकतो. आता महाविकास आघाडीतील पक्ष एकमेकांवर टीका करत आहेत. शिवसेना आणि काँग्रेसने माघार घेतलेल्या उमेदवारांची पक्षतून हकालपट्टी केली असली, तरी राष्ट्रवादी काँग्रेसने तेवढीही तसदी घेतलेली नाही. राजकारणात मानसिकता हादेखील अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. एखादा पक्ष संघटनात्मकदृष्ट्या कमकुवत असू शकतो, आर्थिक अडचणींना सामोरे जात असू शकतो किंवा प्रतिकूल राजकीय वातावरणात काम करत असू शकतो; परंतु त्याची लढण्याची इच्छाशक्ती कायम असेल, तर कार्यकर्ते आणि समर्थक पाठीशी उभे राहतात. उलट, नेतृत्वाकडूनच पराभव स्वीकारल्यासारखा संदेश गेल्यास संपूर्ण संघटनेवर परिणाम होतो. कार्यकर्त्यांचा उत्साह कमी होतो, स्थानिक नेतृत्व संभ्रमात पडते आणि मतदारांमध्ये पक्षाबद्दलचे गांभिर्य कमी होते. महाविकास आघाडीसमोर आज असलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे विश्वासार्हता पुनर्स्थापित करणे. सत्ताधाऱ्यांना पर्याय म्हणून स्वतःला सादर करायचे असेल, तर केवळ पत्रकार परिषदांमधील टीका किंवा विधानसभेतील आक्रमक भाषणे पुरेशी ठरत नाहीत. त्यासाठी प्रत्येक निवडणुकीत सक्रिय सहभाग, संघटन विस्तार, कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद आणि विजयाची मानसिकता आवश्यक असते. राजकीय संघर्ष हा केवळ मोठ्या निवडणुकांपुरता मर्यादित नसतो, तर प्रत्येक लहान-मोठ्या निवडणुकीतून घडत असतो.

महायुतीच्या दृष्टीने पाहिले, तर या निवडणुकीचे परिणाम त्यांच्या संघटनात्मक बळाचे आणि राजकीय व्यवस्थापन कौशल्याचे प्रतीक म्हणून मांडले जातील. विरोधकांना उमेदवार उभे करण्यासही अडचणी येत असताना सत्ताधारी आघाडीने आपली पकड अधिक मजबूत असल्याचा संदेश दिला आहे. राजकारणात प्रतिमा महत्त्वाची असते आणि अनेकदा प्रत्यक्ष निकालांइतकीच महत्त्वाची असते. बिनविरोध निवडून येणाऱ्या उमेदवारांमुळे सत्ताधाऱ्यांच्या आत्मविश्वासाला बळ मिळते, तर विरोधकांच्या कमकुवतपणाची चर्चा वाढते. तथापि, विरोधी पक्षांसाठी या परिस्थितीकडे आत्मपरीक्षणाची संधी म्हणूनही पाहता येईल. निवडणुकीतील अपयश किंवा माघार यांमधून धडे घेत संघटनात्मक सुधारणा करणे शक्य असते. इतिहासात अनेक पक्षांनी पराभवाच्या गर्तेतून पुन्हा उभारी घेतली आहे; मात्र त्यासाठी वास्तव स्वीकारण्याची आणि चुका दुरुस्त करण्याची तयारी आवश्यक असते. महाविकास आघाडीने या घटनांकडे केवळ तात्पुरता राजकीय प्रसंग म्हणून पाहिल्यास भविष्यातील निवडणुकांमध्येही अशाच अडचणी कायम राहू शकतात. लोकशाहीतील सशक्त विरोधक हे कोणत्याही राज्याच्या राजकीय आरोग्यासाठी आवश्यक असतात. सत्ताधाऱ्यांना उत्तरदायी ठेवणे, पर्यायी धोरणे मांडणे आणि जनतेच्या प्रश्नांना प्रभावीपणे आवाज देणे ही भूमिका विरोधकांकडून अपेक्षित असते; परंतु ही भूमिका निभावण्यासाठी प्रथम स्वतःच्या राजकीय अस्तित्वावर आणि क्षमतेवर विश्वास असणे आवश्यक आहे. निवडणूक लढण्याआधीच पराभव स्वीकारल्याचा आभास निर्माण झाला, तर विरोधी राजकारणाची धार बोथट होऊ शकते.

आजच्या घडीला महाविकास आघाडीसमोरचा प्रश्न केवळ काही विधान परिषद जागांचा नाही. हा प्रश्न त्यांच्या राजकीय आत्मविश्वासाचा, संघटनात्मक एकतेचा आणि भविष्यातील दिशेचा आहे. मतदारांना सक्षम पर्याय हवा असतो. तो उभा करण्यासाठी संघर्षाची तयारी, सातत्यपूर्ण राजकीय उपस्थिती आणि विजयाची महत्त्वाकांक्षा आवश्यक असते. अन्यथा, निवडणुकीच्या रणांगणात उतरण्यापूर्वीच माघार घेणारी प्रतिमा निर्माण होते आणि राजकारणात अशी प्रतिमा कोणत्याही पक्षासाठी घातक ठरू शकते.

## चर्चा आजची

# विकास नव्हे अप'घात'!

**संतोष राऊळ**



सध्या देशात मोठ्या प्रमाणात विकास सुरू आहे. प्रत्यक्षात होत नसला, तरी तशी बोंब उठवली जात आहे. सध्याच्या सरकारचं एकचं लक्ष आहे, ते म्हणजे देशातील सर्व राज्ये आणि राज्यातील सर्वात महत्त्वाची ठिकाणे एकमेकांशी जलद गतीने जोडली जावीत. त्यासाठीचा मुख्य दुआ म्हणजे चांगल्या प्रतीचे रस्ते. सध्या राज्य सरकारनं भलतंच मनावर घेतलं असून, पाहावं तिकडं रस्त्यांचीच कामं सुरू आहेत. काही कामं पुर्ण देखील झाली असून, त्यावरून रहदारी देखील सुरू झाली आहे. त्यातील बहुतांश रस्ते स्थानिकांपेक्षा मोठे व्यावसायिक आणि स्थानिक लोकनेत्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पटकन पोहोचण्यासाठी बनविले जात असल्याचं सर्वसामान्यांमधून बोललं जात आहे. सध्या जुन्या नव्या सर्वच रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण सुरू आहे. त्यामुळे ''हाच आपल्या देशाचा विकास'' असा गोड गैरसमज बहुतांश लोकांच्या मनात आहे. जरी हा विकास असला, तरी रस्ते बनविताना रस्त्यांचा दर्जा खुद्द रस्ते मंत्री तपासतात का? त्याचबरोबर रस्ता कितपत सुरक्षित आहे, याचा देखील अभ्यास करतात का? कारण गेल्या काही वर्षांपासून रस्ते अपघातांचे प्रमाण इतके वाढले आहे की, ज्याची काहीच चुकी नसतानाही त्याला आपला नाहक जीव गमवावा लागत आहे. त्यामुळं हा विकास नसुन, अपघातांच्या रूपानं ''घात'' असल्याची चर्चा सर्वसामान्यांतून होत आहे.

राज्यात आज मोठ्या प्रमाणात रस्त्यांचा विकास होत आहे. त्यामुळे खुप लांबचं अंतर वाहनाने काही अवघ्या तासांत पार करता येणं शक्य होणार आहे. त्यासाठी जुन्या रस्त्यांची दुरूस्ती केली जात आहे. त्याचप्रमाणे काही नव्या रस्त्यांची देखील अखणी करण्यात आली आहे. पुर्वी डांबरी रस्ते बनविले जात असतं. मात्र, काही वर्षांपासून डांबराची जागा सिमेंट कॉंक्रीटनं घेतली आहे. याआधी शहराठिकाणी सिमेंट कॉंक्रीटचं जाळं पसरलं होते. आता या रस्त्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागांत देखील पोहोचलं आहे. परिणामी भर उन्हात हे रस्ते प्रचंड तापून परिसराचं तापमान देखील भयानक वाढत आहे. पूर्वी डांबरी रस्ता जरी उखडला गेला तरी त्या ठिकाणी डांबर टाकून त्याची मलमपट्टी होत असे. परंतु, आता एखाद्या ठेकेदारानं एखाद्या सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याचं निकृष्ट दर्जाचं काम केलं असेल, आणि तो रस्ता उखडला तर त्याला पुन्हा सिमेंट टाकून मलमपट्टी करणं शक्य होत नाही. कारण त्यावेळी रस्ता बनविताना वापरण्यात आलेला सिमेंट कॉंक्रीटचा माल वापरत नाहीत. त्यामुळं केलेली मलमपट्टी पुन्हा उखडली जाते. त्यावर शेवटचा उपाय म्हणजे पुन्हा त्यावर डांबरीकरण करणं हाच राहतो. शिवाय कॉंक्रीटीकरण करताना रस्त्याची उंची देखील वाढते. काही ठिकाणी रस्त्याच्या बाजूला गटारं देखील बांधण्यात आली आहेत. परंतु, पावसाळ्यात रस्त्याच्या खाली असणारी घरं, शेती आणि वाड्यांमध्ये पहिल्यापेक्षा जास्त पाणी साचण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, जुन्या रस्त्यांची दुरूस्ती होत असून, नव्यानं काही रस्ते होत आहेत. त्यामुळे दळणवळणाला चालना मिळत आहे. ज्या रहिवासी भागातून रस्ता जातो त्यांच्या व्यवसायाला देखील उभारी मिळेल. पर्यटन व्यवसाय देखील वाढेल. परंतु, विद्यमान सरकारला स्थानिकांपेक्षा देणगीदार व्यावसायिक मित्रांचीच जास्त काळजी असल्याची चर्चा स्थानिकांमधून होत आहे. त्याला कारण असं की, अलिबाग तालुक्यातून निघणारा रेवस-रेड्डी हा रस्ता मुरूड तालुक्यातील आगरदंडा, श्रीवर्धन तालुक्यातील दीघी बंदर, तसेच रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक बंदरं करत जाणारा आहे. त्यातील काही भागांत बड्या व्यावसायिकांची खासगी पोर्ट आहेत. समुद्रमार्गे आलेला माल रस्त्यानं निश्चित स्थळी वेळेत आणि सुखरूप पोहोचण्यासाठीच हा रस्त्यांचा घाट घातल्याचं स्थानिकांमधून बोललं जात आहे. हा रस्ता पुर्ण झाल्यावर मोठंमोठ्या वाहनांची वाहतुक प्रचंड प्रमाणात वाढेल. त्याचा थेट परिणाम या रस्त्याच्या कडेला असणाऱ्या गाव वाड्यांना होणार आहे. पुर्वी रस्त्यांवर मार्गदर्शक फलके असायची. पुढं गतिरोधक, अरूंद रस्ता, पुल, रेल्वे फाटक, खराब रस्ता, धोकादायक वळणे, घाट रस्ता, जीर्ण झालेला पूल, अपघाती ठिकाण असल्याचे फलक असायचे. परंतु, आजकाल ते शोधूनही सापडत नाहीत. एखादा दुचाकीस्वार गतीरोधकावरून उडाल्यावर त्याला कळतं की, येथे गतीरोधक आहे म्हणून. तसेच, असंख्य प्रवासी वर्गाला हे देखील कळत नाही की आपण किती धोकादायक पुलावरून प्रवास करत आहोत. तसेच, नव्यानं बनविण्यात आलेल्या सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यावर तर रोजच भीषण अपघातांची घटना घडत आहेत. महिन्याला शेकडो प्रवाश्यांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. त्यामुळे रस्त्यावर करोडो रुपयांचा खर्च करणाऱ्या विद्यमान सरकारला मार्गदर्शन फलके लावण्याचा खर्च झेपत नाही का? तसेच, रस्ते बनविताना ते किती सुरक्षित आहेत, याचा देखील अभ्यास करणं जिकरीचं होत आहे का, असा संतप्त प्रश्न प्रवासी वर्गातून उपस्थित केला जात आहे. त्यामुळे नव्याने बांधण्यात येणारे रस्ते विकास नसून, अपघातांच्या रूपाने ''घात'' असल्याचे सर्वसामान्यांमधून बोललं जात आहे.

## लोकसंसद

### विमानतळाला जागतिक पुरस्कार, आता नामकरण व्हावे!

जगभरातील उत्कृष्ट वास्तुकला, पर्यावरणपूरक सातत्य, स्थानिक संस्कृतीचे प्रतिबिंब आणि आधुनिक डिझाइन या निकषांवर आधारित असलेला आणि २०१५ पासून दरवर्षी युनेस्कोकडून दिला जाणारा 'प्रिक्स व्हर्सायल्स' हा सर्वोच्च व प्रतिष्ठित पुरस्कार यंदा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मिळाला आहे. नवी मुंबई विमानतळाच्या 'कमळा'च्या फुलावरून प्रेरित असलेल्या सर्वोत्कृष्ट डिझाइनसाठी हा जागतिक पुरस्कार लाभला आहे. नवी मुंबई विमानतळाचा हा गौरव केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे तर संपूर्ण देशासाठी अभिमानास्पद असून या आंतरराष्ट्रीय पुरस्कारामुळे भारताच्या हवाई क्षेत्रातल्या प्रगतीला एक नवी ओळख मिळाली आहे. जागतिक स्तरावर वास्तुकलेचा एक उत्कृष्ट ठरलेल्या या विमानतळाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी महाराष्ट्र शासनाची अग्रगण्य विकास संस्था 'सिडको'ने अत्यंत कष्टप्रद आणि मोलाची भूमिका बजावली आहे. दुसरे म्हणजे जागतिक पुरस्काराच्या या आनंदाच्या क्षणी, हेही विसरून चालणार नाही की 'लोकनेते दि. बा. पाटील' यांच्यामुळेच हे नवी मुंबई विमानतळ आज प्रत्यक्षात अवतरले आहे. दि. बा. पाटील यांनी नवी मुंबईच्या उभारणीसाठी आणि भूमिपुत्रांच्या न्याय्य हक्कांसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांनी दिलेल्या लढ्यामुळे आणि जमिनीच्या योग्य मोबदल्याच्या धोरणामुळेच या विमानतळाच्या उभारणीचा मार्ग मोकळा झाला. अशावेळी या विमानतळाचे लवकरात लवकर 'लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' असे नामकरण व्हावे अशी लोकभावना आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# फ्लाईंग शीख मिल्खा सिंग!



भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांचा आज स्मृतिदिन. १८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले होते. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलिम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५.७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. २०२१ सालीच त्यांच्या पत्नीचे कोरोनाने निधन झाले. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले. ही स्पर्धा पाहण्यासाठी जनरल आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धे नंतरच जनरल आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे पाच वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१८ जून

१) श्री. कैलास बळीराम बंदरी अलिबाग, १८-६-१९५४

२) श्री. रोहिदास गंगाराम वासकर चेंढरे, अलिबाग, १८-६-१९५३

३) श्री. शांताराम नरहरी राऊत चोंढी, अलिबाग, १८-६-१९४२


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



अमृतबेन व प्रेमजी जिवराज जैन, स्मरणार्थ अलिबाग

विमल सॉ मिल उचेडे पेण


## सिताराम मानकर यांचे निधन

**माणगाव :** माणगाव शहरातील सिद्धिनगर, मोर्बा रोड येथील ज्येष्ठ व्यावसायिक सिताराम पांडुरंग मानकर यांचे सोमवारी (दि. १५) जून रोजी निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा आणि नातवंडांसह मोठा परिवार आहे. यांचे निधन ही केवळ एका व्यावसायिकाची एक्झिट नसून, माणगावच्या सामाजिक मूल्यांची जपणूक करणाऱ्या एका प्रेमळ व्यक्तीमत्त्वाची हानी आहे. त्यांच्या जाण्याने सिद्धिनगर परिसरासह संपूर्ण माणगाव शहरात हळहळ व्यक्त होत आहे.



# महिलांची पाण्यासाठी पायपीट

**● दिवसभर पाण्याचे हंडे वाहून नेण्याची वेळ ●टँकर सुरू करण्याची मागणी**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कळंब ग्रामपंचायत मधील चाहूचीवाडी येथील नळपाणी योजना बंद पडली आहे. येथील नवीन नळपाणी योजना अपूर्ण असल्याने येथील आदिवासी ग्रामस्थांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी गेटाची वाडी येथे जाऊन पाणी आणावे लागत आहे. दरम्यान रखरखत्या उन्हात हे आदिवासी लोक पाण्याने भरलेले हांडे वाहून नेत असल्याचे चित्र मुरबाड-कर्जत राष्ट्रीय महामार्गवरून येणारे जाणाऱ्यांच्या नजरेत पडत आहे. दरम्यान, शासनाचे वतीने टँकर सुरू करण्यात यावे अशी मागणी आदिवासी ग्रामस्थ कमळी ढोले यांनी केली आहे.

कर्जत तालुका हा आदिवासी बहुल तालुका म्हणून ओळखला जातो. कळंब ग्रामपंचायतीमधील



चाहुचीवाडी या आदिवासी वाडीसाठी असलेल्या दोन्ही विहिरी कोरड्या पडल्या आहेत. या वाढीसाठी राबवण्यात येत असलेली नळपाणी योजना बंद पडली आहे. तर नवीन जलजीवन मिशनच्या नळपाणी योजनांच्या कामाला खीळ बसला आहे. या वाडीतील तरुणांनी मागील वर्षी वाडीच्या पायथ्याशी असलेल्या कूपनलिकेतून पाणी उचलून जलवाहिनी द्वारे वाडीत आणले होते. मात्र, त्या जलवाहिनीतून देखील पाणी वाडीत पोहचत नसल्याने आदिवासी लोकांच्या तोंडाचे पाणी पळाले आहे. सध्या येथील आदिवासी महिला आणि काही पुरुष देखील पिण्याचे पाणी आणण्यासाठी मुरबाड तालुक्यातील गेटाचीवाडी येथे जाऊन पाणी आणत आहेत. या आदिवासी वाडीमध्ये सौर पंप असलेल्या कूपनलिकेतून मिळणारे पाणी चहूची वाडीत आणण्यासाठी चार किलोमीटर प्रवास करावा लागत आहे.

पाण्याची टंचाई वाढल्याने येथील महिलांची सकाळ पाण्याचे हांडे घरातून घेऊन गेटाची वाडी असा प्रवासाने होत आहे. महिला सकाळी आठ वाजता पाणी आणण्यासाठी निघतात. मुरबाडमधील गेटाचीवाडी या आदिवासी वाडीमध्ये सौर पंपावर तासभर थांबावे लागते. त्यानंतर या महिलांना चार ते पाच हांडे भर पाणी मिळते. त्यानंतर या महिला ते पाणी घेऊन मुरबाड कर्जत राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरून पायपीट करून घराकडे येत असतात. वाडीतील महिलांना घरातील जनावरांसाठी देखील पाणी न्यावे लागते. तर आठवड्याचे कपडे महिलां उल्हास नदीवरील दहिवळी पूल येथे जाऊन धुवून आणावे लागतात. त्यासाठी देखील येथील आदिवासी लोकांना खास रिक्षा करून कपडे घेऊन नदी गाठावी लागते.

> **“शासनाने आमच्या वाडीतील पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी तत्काळ टँकर सुरू करावा अशी मागणी आहे. आमच्या संयमाची प्रतीक्षा सरकारने पाहू नये आणि टँकर सुरू केला नाही तर आम्ही राष्ट्रीय महामार्गावर बसून रस्ता अडवण्यास देखील मागे पुढे पाहणार नाही.**
>
> **– कमळी ढोले**
> **स्थानिक महिला”**

## राजिप शाळा तळे येथे प्रवेशोत्सव

**। तळा । प्रतिनिधी ।**

राजिप शाळा तळे मराठी येथे शाळा प्रवेशोत्सव स्वाती पाटील तहसीलदार तळा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उत्साहात पार पडला.

कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भास्कर गोळे, वेदीका गोरीवले, तळा केंद्राचे केंद्रप्रमुख वास्कर, मंडळ अधिकारी मालुसरे, सुप्रिया जामकर, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, सर्व पालक व शिक्षक वृंद, अंगणवाडी ताई, इयत्ता पहिली ते सातवीचे विद्यार्थी उपस्थित होते. सर्वप्रथम सर्व नवागत विद्यार्थ्यांसह प्रभात फेरी काढण्यात आली. त्यानंतर नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ भेट देऊन स्वागत करण्यात आले.




## प्रमोद म्हसकर प्रतिष्ठानतर्फे वह्या वाटप



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील रा.जि.प प्राथमिक शाळा गोवे येथे मंगळवार (दि. १६) जुन रोजी सेवा, शिक्षण आणि आरोग्य यांच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असणारे प्रमोद म्हसकर सामाजिक प्रतिष्ठानतर्फे इयत्ता १ ली ते ४ पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्यध्यापिका रुपाली कापसे यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असणाऱ्या प्रमोद म्हसकर सामाजिक प्रतिष्ठानचे शब्द सुमनाने स्वागत केले. यावेळी विजय पवार, निखिल वाफिलकर, मंदार जाधव, ललित जाधव, निलेश जाधव, रोशन जाधव, साहिल जाधव, सहेंद्र पवार, लवकेश जाधव, सत्कार कापसे, मधुकर जाधव, प्रमोद म्हसकर उपस्थित होत्या. मुलांना दिलेल्या भेटीबद्दल मुख्याध्यापक रुपाली कापसे, प्रतिक्षा बडे, विजय जाधव, मेघना जवके, प्राजक्ता दहिंबेकर, सर्व पालक, विद्यार्थीकडून प्रमोद म्हसकर सामाजिक प्रतिष्ठानचे आभार मानले.

## आपटवणे शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**। पाली । प्रतिनिधी ।**

शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली रायगड जिल्हा परिषद शाळा आपटवणे येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी माणगावचे डॉ. बी. ज. शिंदे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या वह्या पाणी बॉटल्स स्केच पेन रंगीत खडू आधी वस्तूंचा समावेश होता विद्यार्थी व सर्व पालक या उदारपणामुळे आनंदित होते.

आजच्या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षश्र



नेहा ढिसे, उपाध्यक्षा मयुरी दंत, विशाल उतेकर, पांडुरंग निरगुडा, प्रकाश राठोड, चंद्रकांत दरवडे, संगीता लेंडे, मनस्वी दंत शाळेतील शिक्षक गणेश म्हात्रे, राजेंद्र पाटील, नवनीत म्हात्रे, सीमा वैद्य आदी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## एकल महिला धोरणासाठी कार्यशाळेचे आयोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राज्यातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी महाराष्ट्र शासन स्वतंत्र एकल महिला धोरण तयार करीत आहे. या धोरणाला अधिक व्यापक, स्वरूप देण्यासाठी जिल्ह्यात जिल्हास्तरीय कार्यशाळा शुक्रवारी (दि.१८) जून रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग येथील राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत जिल्ह्यातील एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, विषयतज्ज्ञांकडून सूचना व अभिप्राय स्वीकारण्यात येणार आहेत. रोजगाराच्या संधी, मालमत्ता हक्क, अपत्यांचे शिक्षण, निवारा, शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील सुधारणा लिखित स्वरूपात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## दादर आयटीआयमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), दादर, मुंबई येथे शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत ऑगस्ट २०२६ सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य व्ही. जे. संखे यांनी दिली आहे. प्रवेश अर्ज, प्रवेश पद्धती, नियमावली तसेच वेळापत्रक यासंदर्भातील सविस्तर माहिती प्रवेश संकेतस्थळ admission.dvet.gov.in वर उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रवेश प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक अथवा इतर शंकांचे निरसन करण्यासाठी संचालनालयाच्या मदत कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मदत कक्षाशी संपर्क साधण्यापूर्वी उमेदवारांनी माहितीपुस्तिकेचा अभ्यास करावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

संस्थेमध्ये कम्प्युटर हार्डवेअर ॲण्ड नेटवर्क मेंटेनन्स या एक वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी ४८ जागा उपलब्ध आहेत. इलेक्ट्रॉनिक मेकॅनिक, इन्फॉर्मेशन ॲण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी सिस्टीम मेंटेनन्स, मॅकेनिक मोटार व्हेईकल आणि टेक्निशियन मेकॅट्रॉनिक्स या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमांसाठी २४-२४ जागा उपलब्ध आहेत. प्रवेश प्रक्रियेतील माहिती मिळविण्यासाठी उमेदवारांनी संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## शाळा-महाविद्यालयातच मिळणार ‘लालपरी’चे पास

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

उन्हाळी सुट्ट्या संपून १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली आहे. यंदाच्या वर्षीही शालेय विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालयातच एसटीचे पासेस देण्यात येणार आहे. त्याचे नियोजन जिल्ह्यातील आगारातून सुरू झाले आहे. ज्या शाळांनी मागणी केल्यास त्यांनाही अर्ज, पासेस देण्यात येईल. पासमध्ये मुलींना मोफत तर मुलांना ६६ टक्के सवलत मिळणार आहे.

शाळा महाविद्यालयात जाण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील दररोज हजारो-लाखो विद्यार्थी एसटी बसेसमधून प्रवास करत असतात. दरम्यान, आता एसटी महामंडळाच्या बसेसमुळे ग्रामीण




भागातील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध सवलतीचे पास दिले जातात. आता या पासेससाठी एसटी महामंडळात जायची गरज राहणार नाही. आता थेट शाळेतच विद्यार्थ्यांना पासेस देण्याची सोय करण्यात आली आहे.

शासनाच्या अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटीचे पासचे वितरण केले जाते. एसटीच्या पास केंद्रावर जावून रांगेत उभे न राहता आता शाळा, महाविद्यालयातच पासेस मिळणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया जाणार नाही. पासेससाठी आगारप्रमुखांना द्यावे लागणार पत्रशाळा-महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींना पासेससाठी त्यांना बोनाफाईड व एक छायाचित्र द्यावे लागणार आहे. तसेच मुख्याध्यापक किंवा प्राचार्यांना त्यांच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना मोफत बस पास द्यायचे असल्यास तसे पत्र आगारप्रमुखांना द्यावे लागणार आहे.

**मुलींच्या सुरक्षिततेसाठी विशेष खोली | मोफत गणवेशासह पाठ्यपुस्तकांचे वाटप**

# भालिवडीत शासकीय आश्रमशाळेत पिंकरूम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील भालिवडी येथील शासकीय आदिवासी कन्या आश्रमशाळेत मुली शिक्षण घेतात. या शासकीय आश्रमशाळेत शिकणाऱ्या मुलींच्या आत्मसन्मान आणि आरोग्य सुरक्षितता यांच्यासाठी खास पिंक रूम बनवण्यात आली आहे. दरम्यान, आदिवासी विकास विभागाच्या पेण प्रकल्प यांच्याकडून राबवण्यात आलेल्या पिंकरूम बद्दल मोठी उत्सुकता राज्यभर निर्माण झाली आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या वतीने कर्जत तालुक्यातील भालिवडी येथील मुलींच्या शासकीय आश्रमशाळेत



पिंक रूम बनवण्यात आले आहे. या पिंक रूमचे उद्घाटन राज्याचे आदिवासी विकास विभागाचे सचिव विकास वाघमारे यांचे हस्ते झाले. यावेळी समाजकल्याण समितीचे सभापती नारायण डामसे, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त गोपीचंद कदम, ललित कुमार वराडे तसेच बाबू घारे, प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे मार्गदर्शनाखाली आदिवासी विकास विभागाच्य शासकीय आश्रमशाळेत असा उपक्रम पहिल्यांदा राबवण्यात आला आहे. तसेच भालिवडी येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत उभारण्यात आलेल्या डिजिटल पॅनल वर्गांचे तसेच टॅब रूमचे उद्घाटन आदिवासी विकास विभागाचे सचिव वाघमारे यांचे हस्ते करण्यात आले.

भालिवडी शासकीय आश्रमशाळेत शिकणाऱ्या किशोरवयीन मुलींना मासिक पाळीच्या अत्यंत संवेदनशील काळात हक्काचा आराम, स्वच्छता, आणि मानसिक बळ मिळावे या उद्देशाने वसतिगृहातील एका स्वतंत्र खोली निर्माण करण्यात आली. मुलींच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरामदायी बेडची सोय करण्यात आली आहे.

> **“रानावनांतून आलेल्या या आदिवासी कन्या आपल्या डोळ्यांत स्वप्नांचे मोती घेऊन जेव्हा शाळेच्या उंबरठ्यावर उभ्या राहतात, तेव्हा त्यांच्या पंखांना बळ देण्याचे काम या ‘पिंक रूम’च्या माध्यमातून पेण प्रकल्पाने केले आहे. हा उपक्रम आगामी काळात संपूर्ण राज्यासाठी एक आदर्श वस्तुपाठ ठरेल यात शंका नाही.**
>
> **-तेजस्विनी गलांडे**
> **प्रकल्प अधिकारी”**

## निवडक



### अनाथाश्रमध्ये शालेय साहित्य वाटप

**उरण :** शिव प्रतिष्ठान करंजाडे या सामाजिक संस्थेने शिव राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून अनाथ निराधार मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून एक समाजापूढे आदर्श निर्माण केला आहे. या कार्यक्रमाला शिवप्रतिष्ठान अध्यक्ष सत्यजित पाटील, सुनील अंबावडे, प्रशांत श्वट्टी, अमर कुसले, राकेश कुसले, योगेश कुलाल, अथर्व आदी मान्यवर उपस्थित होते. शिवप्रतिष्ठान करंजाडे या सामाजिक संस्थेतर्फे वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. सदर राबविलेल्या उपक्रमामुळे अनाथ निराधार मुलांना अत्यंत गरजेचे असलेले शैक्षणिक साहित्य प्राप्त झाल्याने त्यांनी आनंद व्यक्त करत शिवप्रतिष्ठान करंजाडेचे आभार मानले. सदर उपक्रमाचे सर्वच क्षेत्रातून कौतुक होत असून असे उपक्रम सर्वत्र राबविले पाहिजे अशा भावना जनतेतून व्यक्त होत आहे.



### आश्रमशाळेत वह्याचे वाटप

**पाली :** बहुजन विद्यार्थी संघटना रायगड जिल्हा व सुधागड तालुक्याच्या वतीने बहुजन विद्यार्थी संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल वाणी यांच्या वाढदिवसानिमित्त सुधागड तालुक्यातील पडसरे येथील आश्रमशाळेमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये वह्या, पेन व अन्य शैक्षणिक साहित्यांचा समावेश होता. या कार्यक्रमास बहुजन विद्यार्थी संघटना रायगड जिल्हाध्यक्ष अमित गायकवाड, रमेश जाधव, निशांत पवार, ॲड. सुशील गायकवाड, अक्षय गायकवाड, चेतन भालेराव तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. या स्तुत्य उपक्रमाबाबत शाळेचे मुख्याध्यापक संदीप शिंदे यांनी बहुजन विद्यार्थी संघटनेचे आभार मानले. यावेळी गणेश महाडिक, गार्गी चोरगे, मीनाक्षी ढोपे, दिपाली घरट, श्वेता जाधव, सुधीर क्षीरसागर, राजू मोरे, मेघना भडवलकर, किरण माळी, मनीषा इंगळे, अनिल साजेकर, मयूर सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

### स्वरूपचे एमएच सीईटी परीक्षेत यश


**नागोठणे :** महाराष्ट्र एमएचटी सीईटी परीक्षेचा (पीसीएम - फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथ्स) गटाचा निकाल नुकताच अधिकृतपणे जाहीर करण्यात आला आहे. या परीक्षेत नागोठण्याजवळील हेदवली येथील स्वरूप लाड या विद्यार्थ्याने ९९.०४ टक्के गुण मिळवून नेत्रदिपक यश मिळविले आहे. स्वरूपला एमएच सीईटी परीक्षेसाठी प्रा. भास्कर मुसळे, अनुज मुसळे, अनुप मुसळे, अश्विनी यांचे मार्गदर्शन लाभले. स्वरूप याने जिंदाल माऊंट लिटेराझी स्कूलमधून इयत्ता १० पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले असून दहावीच्या सीबीएसई परीक्षेत त्याने ८० टक्के गुण मिळविले आहेत. तर भारत इंग्लिश मीडियम स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, पुणे येथून बारावी शस्त्र शाखेत ८२.३२ टक्के गुण मिळविले आहेत. याच्या सीईटी परीक्षेतील या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.





### वांगणी हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे औक्षण

**सुकेळी :** सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक विद्यालय वांगणी येथे विद्यार्थ्यांचा शाळेमध्ये २०२६ चा प्रवेशोत्सव सोमवारी (दि.१५) उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेमध्ये नविन प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत व औक्षण करण्यात आले. तसेच पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यात आले. तसेच शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके तसेच प्रमोद म्हसकर यांच्यातर्फे सुधीर ढाणे यांनी विद्यार्थ्यांना वह्या व छत्र्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला वांगणी हायस्कूलचे स्थानिक समिती अध्यक्ष मधुकर ठमके, सदानंद गायकर, हरिश्चंद्र तेलंगे, चंद्रकांत गायकवाड, मोरेश्वर तेलंगे, किशोर नावळे, सुधीर ढाणे, संपदा ठाकुर, भारती जाधव, वैशाली जाधव, मोनाली रेवाळे, अनिता कदम आदी पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक टिळक खाडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी गायकवाड तर आभार प्रदर्शन शिक्षिका घरट यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या संपूर्ण शिक्षकांनी मेहनत घेतली होती.



### वि. खे. हायस्कूलमध्ये पालकांची गर्दी

**पनवेल :** अकरावी प्रवेश प्रक्रियेला वेग आला असून शनिवारी तिसरी गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर पनवेल येथील वि. खे. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज परिसरात पालक व विद्यार्थ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. प्रवेश निश्चित करण्यासाठी, कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी तसेच पुढील प्रक्रियेची माहिती घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात हजेरी लावली. येत्या काही दिवसांत अकरावीचे नियमित वर्ग सुरू होणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. महाविद्यालय प्रशासनाने प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी आवश्यक व्यवस्था केली होती. विद्यार्थ्यांना विविध शाखांमधील उपलब्ध जागांची माहिती देण्यात आली. तिसरी यादी लागल्यानंतर प्रवेशासाठी आलेल्या विद्यार्थ्यांमुळे महाविद्यालय परिसर दिवसभर गजबजलेला दिसून आला.

# निवडक



## उरण नाक्यावर वाहतूक कोंडी

**पनवेल :** शहरातील उरण नाका परिसरात बुधवारी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. उरण नाका चौकातून घाऊक बाजारपेठ, मच्छि मार्केट तसेच रायगड कृषी उत्पन्न बाजार समितीकडे जाणाऱ्या सर्व प्रमुख मार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. वाहतुकीचा ताण वाढल्याने चारही दिशांनी रस्ते पूर्णपणे ठप्प झाल्याचे चित्र दिसून आले. बाजारपेठेकडे जाणाऱ्या मालवाहू वाहनांसह दुचाकी, रिक्षा आणि खासगी वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. वाढत्या उष्णतेमुळे वाहतूक कोंडीत अडकलेल्या नागरिकांना उन्हाचा तीव्र त्रास सहन करावा लागला. वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी प्रयत्न केले. मात्र, वाहनांची संख्या अधिक असल्याने काही काळ परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली होती. यामुळे परिसरात संथ गतीने वाहतूक सुरू राहिली. नागरिकांनी उरण नाका परिसरातील वाहतूक व्यवस्थेत कायमस्वरूपी सुधारणा करण्याची मागणी केली आहे.



## वरंध गावात बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक

**वरंध :** महाड तालुक्यातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती व्हावी यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली संलग्न रायगड शैक्षणिक संकुल महाड, संचलित कृषी महाविद्यालय मोहोप्रे-आचळोली (महाड) येथील कृषिदूतांनी वरंध गावात ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक करून दाखवले. शेतकऱ्यांनी ही बीज प्रक्रिया कशी व का करावी या संदर्भात कृषिदूतांनी संपूर्ण माहिती दिली. त्याचबरोबर बियाण्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी बीज प्रक्रिया कशी उपयोगी आहे हे पटवून सांगितले. त्यावेळी शेतकऱ्यांना रासायनिक व जैविक खतासह बीज प्रक्रिया करून दाखवली. शेतकरी नक्कीच या प्रात्यक्षिकांचा अवलंब करतील व आपल्या शेतामध्ये उत्तम निरोगी बियाणे तयार करतील असा विश्वास यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केला. यावेळी वरंध गावचे वरिष्ठ नागरिक उपस्थित होते. कृषी महाविद्यालय मोहोप्रे-आचळोलीचे प्राचार्य व विषयतज्ञ डॉ. व्ही. जे. गिम्हवणेकर, कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. एस.रायकर, कार्यक्रम अधिकारी एन. व्हि.सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक दाखविले. कृषी महाविद्यालयातील हणमंत सुरवसे, अथर्व थोरवे, प्रसाद केदार, कौशल ठाकूर, स्वप्नील चव्हाण, रोहन निंबाळकर, गौरव काळे, सार्थक पानसरे यांचा समावेश आहे.

## पावसाच्या विलंबामुळे शेतकरी हवालदिल

**रेवदंडा :** मान्सूनच्या आगमनास विलंब होत असल्याने रेवदंडा पंचक्रोशीतील शेतकरी, बागायतदार आणि सर्वसामान्य ग्रामस्थ चिंतेत सापडले आहेत. जून महिन्याचा मध्य उलटत आला तरी पाऊस न झाल्याने परिसरात पाणीटंचाईची समस्या अधिक तीव्र झाली आहे. विहिरी, बोअरवेल आणि पाणवठ्यांची पातळी घटल्याने अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतकरी शेतीची पूर्वतयारी पूर्ण करून पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. भात लागवडीसाठी शेतांची मशागत, बांधबंदिस्ती आणि अन्य कामे पूर्ण झाली असली तरी पावसाअभावी पेरणी व लागवडीची कामे रखडली आहेत. वेळेत पाऊस न झाल्यास भात उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत. तीव्र उष्णतेमुळे आंबा, नारळ, सुपारी तसेच इतर फळबागांवरील झाडांना पाण्याअभावी ताण जाणवत असून अतिरिक्त पाणीपुरवठ्यासाठी खर्च वाढला आहे. सततच्या उकाड्यामुळे नव्या लागवडींनाही फटका बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे. रेवदंडा पंचक्रोशीसह मुरूड तालुक्यातील साळाव, कोर्लई, बोर्ली, मांडळा, शिरगाव, मिठेखार, वळके, चोरढा तसेच अलिबाग तालुक्यातील रेवदंडा, थेरोंडा, चौल, नागाव, वावे, खानाव, रामराज, वळवळी, चिंचोटी, सुडकोळी आदी भागांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- दुकानगाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. ऑल राऊंडर कुक (कॉंटिनेंटल सुद्धा येणे आवश्यक) रेस्टॉरंट कॅप्टन, मेन्टेनन्स पर्सन, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबा. ७५५९१८४६१२
- Office staff required Graduates can call for interview. Trainee undergraduates required. Call 9150717038
- घरकामासाठी कायमस्वरूपी राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : ₹ १५,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम मिळेल. (फैमिली केयरटेकर रूम मध्ये राहू शकते.) इच्छुकांनी संपर्क साधावा. 7875866555
- आर्किटेक्चर आणि इन्टेरियर डिझाइनिंग ऑफिस करीता स्टाफ हवा आहे. संपर्क - 9762777975
- वाडगाव फाटा येथे कॉटेज सांभाळण्याकरीता माणूस हवा आहे. संपर्क - 9822938444
- नामांकित कंपनीसाठी ड्रायव्हर पाहिजे, अनुभवी परवाना धारक मासिक वेतन अनुभवानुसार मो.९०११०२६२६३.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# हॉटेल व्यावसायिकांनी घेतला मुंढेचा धसका

## ● उरणमध्ये पामतेलच्या जागी जेमिनीचा वापर

**। उरण । प्रतिनिधी ।**

राज्यातील कर्तव्यदक्ष आणि कठोर प्रशासनासाठी ओळखले जाणारे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्त पदाची सूत्रे स्वीकारल्यांनतर राज्यभरात अन्नसुरक्षा, भेसळ प्रतिबंध आणि अवैध व्यावसायांविरोधात कारवाईचा वेग वाढवला आहे. त्यांच्या या कठोर भूमिकेमुळे अनेक ठिकाणी व्यापारी आणि अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. त्या कारवाईचा धसका आता उरण तालुक्यातील हॉटेल व्यावसायिकांनी घेतला असून हॉटेलमधील खाद्य पदार्थांच्या वापरामध्ये पामतेला ऐवजी सर्रासपणे



जेमिनी तेलाचा वापर करण्यास सुरुवात केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

उरण हे मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असलेला तालुका असून या तालुक्यात जेएनपीए बंदर, एन ए डी, ओएनजीसी, भारत गॅस तसेच इतर महत्वाचे शासकीय व खासगी प्रकल्प आहेत. या तालुक्याच औद्योगिककरण व नागरिकरण झपाट्याने वाढत असल्याने हॉटेल, खाणावळ या सारख्या इतर खाद्यपदार्थ व्यवसायिकांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मात्र, सदर व्यावसायिकांवर कोणाचा अंकुश नसल्याने सदर व्यवसायिक हे पामतेलामध्ये तयार करणारे पदार्थ हे उघड्यावर ठेवून नागरिकांच्या जिवाशी खेळण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्त पदाची अवैध व्यावसायांविरोधात कारवाईचा वेग वाढवला आहे. त्यांच्या या कठोर भूमिकेमुळे अनेक ठिकाणी व्यापारी आणि अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. त्या कारवाईचा धसका आता तालुक्यातील हॉटेल व खाद्यपदार्थ व्यावसायिकांनी घेतला असून हॉटेल खाद्य पदार्थांच्या वापरामध्ये आता पामतेला ऐवजी सर्रासपणे जेमिनी तेलाचा वापर करण्यास सुरुवात केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. एकंदरी नियमांचे पालन न करणारे, निकृष्ट अथवा भेसळयुक्त वस्तूंची विक्री करणारे आणि बेकायदेशीर व्यवहार करणारे व्यापारी विशेषतः सतर्क झाल्याचे दिसून येत आहे.

> **व्यावसायिक सतर्क**
> एकंदरी नियमांचे पालन न करणारे, निकृष्ट अथवा भेसळयुक्त वस्तूंची विक्री करणारे आणि बेकायदेशीर व्यवहार करणारे व्यापारी सतर्क झाल्याचे दिसून येत आहे.



## म्हसळ्यात खरीप हंगामाची तयारी पूर्ण

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यात खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी शेती मशागतीची व पेरणीपूर्व तयारीची बहुतांश कामे पूर्ण केली आहेत. आता बळीराजा आकाशाकडे नजर लावून पावसाची आतुरतेने वाट पाहत आहे. जून महिन्याच्या प्रारंभी काही भागात तुरळक पावसाच्या सरी कोसळल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी नांगरणी, कुदलणी, बांधबंदिस्ती तसेच पेरणीसाठी आवश्यक शेतीची मशागत पूर्ण केली आहे. तालुक्यात भात हे प्रमुख खरीप पीक असून त्यासाठी लागणारे बियाणे, खते व इतर कृषी साहित्याची खरेदीही शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात केली आहे. काही ठिकाणी भात रोपवाटिकांची तयारी पूर्ण झाली असून रुजवण झाली आहे. आता जोरदार व सातत्यपूर्ण पावसाची प्रतीक्षा सुरू आहे. पाऊस वेळेत व समाधानकारक प्रमाणात झाल्यास यंदाचा खरीप हंगाम चांगला जाईल अशी आशा शेतकरी व्यक्त करीत आहेत. गत काही वर्षांतील अनियमित पावसामुळे शेती उत्पादनावर परिणाम झाला होता. त्यामुळे यावर्षी मान्सून वेळेत सक्रिय होऊन शेतीला पोषक वातावरण निर्माण व्हावे अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. सध्या तालुक्यातील शेतशिवारांमध्ये मशागतीची कामे पूर्ण झालेली दिसून येत असून सर्वत्र पावसाच्या स्वागतासाठी शेती सज्ज झाली आहे. या वर्षी कृषी विभागानेही शेतकऱ्यांना हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन पेरणीचे नियोजन करण्याचे आवाहन केले आहे. पावसाने पाठ फिरवली असून तालुक्यातील बळीराजा मात्र, आशावादी आहे.

## खोपटे वैकुंठभूमीत वृक्षारोपण



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्याच औद्योगिककरण व नागरिकरण झपाट्याने वाढत आहे. मात्र, त्याठिकाणी झाडांची लागवड करत नाही. भविष्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक संकटावर मात करायची असेल वृक्षारोपण करणे ही काळाची गरज असल्याचे मत उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील यांनी व्यक्त केले. मनसेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या जन्मदिनी ॲड. सत्यवान भगत यांनी खोपटे वैकुंठभूमीत वृक्षारोपणाचा उपक्रम नुकताच हाती घेतला होता. यावेळी सुधाकर पाटील, संतोष पाटील, कुमार ठाकूर, कल्पेश कडू, निलेश भगत, दीपक पाटील, राकेश भोईर, बबन ठाकूर, ग्रामस्थ, व कार्यकर्ते उपस्थित होते.

## स्वप्नाली पवार यांना देवज्ञा

**कोलाड :** गोवे गावच्या स्वप्नाली सुनील पवार यांचे



शुक्रवारी (दि.१२) जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. स्वप्नाली यांच्या पार्थिवावर गोवे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा मुलगी, असा मोठा पवार परिवार आहे. यांचा दशक्रियाविधी शनिवारी (दि.२०) जून रोजी तर अंतिम धार्मिक विधी मंगळवारी (दि. २३) जून रोजी राहत्या घरी गोवे येथे होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## तासगावकर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील सरस्वती एज्युकेशन सोसायटी संचलित यादवराव तासगावकर इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये करिअरच्या विविध संधी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास सरस्वती एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार तासगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग ओला, जयवंती कोळंबे, अंकुश बागडे, उत्तम कोळंबे, राम कोळंबे, प्राचार्य डॉ निलेश पवार, आदी उपस्थित होते.

स्वप्ना कुंभार देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी रोजगाराच्या संधी, उद्योग क्षेत्रातील वाढत्या मागण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी विचारेल्या प्रश्नाचे शंकांचे निरसन करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. हरीश बरापात्रे, प्रा. समाधान पाटील, प्रा. रवींद्र जाधव, प्रा. योगिता जांभळे आणि डॉ. संतोष वानखेडे, प्रा. सुजाता जगताप, प्रा. राजन नेमाडे, रामदास बागडे सदाशिव मुने यांनी विशेष परिश्रम घेतले.

## स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती थांबवा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात वीज ग्राहकांची कोणतीही परवानगी न घेता स्मार्ट मीटर बसवले जात आहेत. वीज ग्राहकांच्या असंख्य तक्रारी शिवसेना ठाकरे पक्षाकडे आल्या होत्या. महावितरण कंपनीकडून ग्राहकांच्या कोणत्याही प्रकारच्या परवानग्या न घेता स्मार्ट मीटर बसवले जात आहेत. त्यामुळे महावितरण कंपनीच्या या स्मार्ट मीटर विरोध शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आक्रमक झाला आहे. दरम्यान स्मार्ट मीटर बसवण्यास स्थगिती दिली नाही तर शिवसेना रस्त्यावर उतरेल आणि प्रसंगी खळखटाक आंदोलन छेडेल असा इशारा महावितरण कंपनीला दिला आहे.

बाजीराव दळवी यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचे शिष्टमंडळ महावितरणळचे उप अभियंता चंद्रकांत केंद्रे यांना भेटले. यावेळी सुनिता मोरे, रामदास घरत, लहु श्रीखंडे, सुरेश बोराडे, बंडू क्षीरसागर, संदीप रुठे, अजय कराळे, पंढरीनाथ मोडक, महेश लोट, महेश मोंधले, तसेच अन्य पदाधिकारी होते. स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती तात्काळ थांबविण्यात यावी. ग्राहकांच्या संमतीशिवाय कोणत्याही घरात किंवा आस्थापनात स्मार्ट मीटर बसवू नयेत. याबाबत शिवसेना ठाकरे गटाकडून निवेदन देण्यात आले आहे.

स्मार्ट मीटरमुळे वीज दरवाढ, प्रीपेड प्रणालीची सक्ती, तांत्रिक अडचणी तसेच सर्वसामान्य ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची भीती नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे स्मार्ट मीटर बसविण्याबाबत ग्राहकांची संमती घेणे आवश्यक आहे. कोणत्याही ग्राहकावर त्याच्या इच्छेविरुद्ध स्मार्ट मीटर बसविण्याची जबरदस्ती करू नये. वरील मागण्यांचा सकारात्मक विचार करून योग्य ती कार्यवाही करावी, जर आमच्या मागण्यांचा विचार केला नाही तर शिवसेना पद्धतीने आंदोलन करण्यात येईल असाही इशारा महावितरण कंपनीला देण्यात आला आहे.

## रेल्वे पोलिसांचे ‘झिरो मिशन डे’ अभियान,

**पनवेल :** रेल्वे अपघातांमुळे होणारे मृत्यू आणि जखमींचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने रेल्वे पोलीस आयुक्तालयांतर्गत पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याच्या वतीने बुधवारी (दि. १७) जून रोजी ‘झिरो मिशन डे’ अभियान राबविण्यात आले. प्रवाशांमध्ये रेल्वे सुरक्षेबाबत जनजागृती करून अपघातांना आळा घालण्याचा या अभियानाचा मुख्य उद्देश होता. रेल्वे रुळ ओलांडणे, चालत्या रेल्वेत चढणे किंवा उतरणे, तसेच निष्काळजीपणे प्रवास करणे टाळावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



## पेरलेले धान्य वाचवण्यासाठी नामी शकल

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

जून महिना हा खऱ्या अर्थाने पावसाचा असतो. मात्र, या वर्षी ‘अल निनो’मुळे पाऊस लांबला आहे. मात्र, पाऊस नियोजन वेळेवर पडेल या विश्वासाने शेतकऱ्यांनी शेतात पेरणी केली आहे. पंधरा दिवस होऊन सुद्धा पावसाचे आगमन होत नसल्यामुळे शेतामध्ये पेरलेले धान्य, पक्षांचे खाद्य बनत आहे. आपण पेरलेले धान्य त्यास उत्तम अंकुर यावे शिवाय पक्षांपासून संरक्षित व्हावे यासाठी शेतकऱ्यांनी प्लास्टिकच्या पट्टा बांधून, आणि वाऱ्याच्या प्रवाहाने आवाज निर्माण होत असल्यामुळे पक्षी या ठिकाणी धान्य वेचण्यास येत नसल्यामुळे शेतकऱ्यांचे धान्य वाचत आहे.

दरवर्षी पाऊस हा नियोजित वेळेवर पडत असतो. यावर्षी सुद्धा पाऊस पडेल अशी आशा शेतकऱ्याची होती. यामुळे काही शेतकऱ्यांनी पेरणी सुद्धा केल्या तप्त उन्हात पेरलेले धान्य पावसाच्या आगमनाने उत्तम प्रकारे येत असते. मात्र, हेच पेरलेले धान्य आता शेतकऱ्यांसाठी भीतीदायक निर्माण झाले आहे. मात्र, पेरणी केली असून सुद्धा, आणि पक्षापासून बचाव करण्यासाठी पूर्वीपासून शेतकरी सातत्याने देशी जुगाड हा करीत असल्यामुळे यामुळे शेतकऱ्यांनी शेतातील धान्य वाचण्यास मदत होत आहे.

घरातील प्लास्टिकच्या पट्ट्याच्या माध्यमातून आणि पेरलेल्या धान्याच्या सभोवताली छोटे- छोटे लाकडाचे तुकडे करून, आणि त्याच प्लॅस्टिकच्या पट्ट्या बांधण्यात आले आहे. दिवसभर सातत्याने वाऱ्याचा प्रभाव मोठ्या प्रमाणात असल्यामुळे हाच वारा या बांधलेल्या पट्ट्यावर आदल्यास एक विशिष्ट प्रकारचा आवाज निर्माण होत असल्यामुळे पक्षी या ठिकाणी फिरकत नसलेले दृश्य पहावयास मिळत आहे.

सातत्याने या ठिकाणी उभे राहून पेरलेल्या धान्याचे संरक्षण करणे शक्य होत नसल्यामुळे ही नामी शकल शेतकऱ्यांसाठी मोठी वरदान ठरत असल्याचे बोलले जात आहे.

## अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासन, नागरी संरक्षण दल उरण रायगड यांच्या मार्फत जिल्हास्तरीय अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. जिल्हाधिकारी आणि उपनियंत्रक यांच्या प्रमाणपत्रवर सह्या होऊन उपनियंत्रक कार्यालय बोरी उरण याठिकाणी प्रमाणपत्र वितरण सोहळा संपन्न झाला.



प्रशिक्षणाद्वारे अग्निसुरक्षा, आग विझविण्याची तंत्रे, बचावकार्य, आपत्कालीन परिस्थिती व्यवस्थापन, हायड्रंट ड्रिल, टेलर पंप ड्रिल, शिडी कवायत, दोऱ्या आणि गाठींचे प्रकार, आपत्कालीन विमोचन पद्धती तसेच प्रथमोपचार याबाबत सखोल ज्ञान व कौशल्य प्राप्त झाले.

प्रमाणपत्र वितरणासाठी शशिकांत शिरसाठ सहाय्यक उपनियंत्रक, रूमा डुमणा कार्यालयीन कर्मचारी, नामदेव म्हात्रे, हरेश्वर ठाकूर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.

पाठ्यक्रममध्ये प्रथम क्रमांक मानसी वर्तक हिने पटकाविला, द्वितीय क्रमांक शुभम वीर, समीक्षा ठाकूर तसेच तृतीय क्रमांक वैष्णवी वर्तक, मानसी ठाकूर, मनाली पाटील, अनुष्का किल्लेकर यांनी मिळविला. पाठ्यक्रम यशस्वी करण्याकरिता मयूर पाटील, आयुष मोहिते, भूमी मोकल, वैदेही गावंड, प्रतीक तांडेल, किमया गायकवाड, शुभम वीर, विवेक दबडे, मंदार म्हात्रे, भाविक पाटील, दौलत पाटील, कुशल मढवी, कांशिता म्हात्रे, पार्थ ठाकूर, प्राजक्ता पाटील, रेशम कोळी, प्रणाली सकपाळ, सुजल पाटील, श्रेया भोपी, स्नेहल मोकल, राजेश म्हात्रे, पूजा कडू यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

कर्जत स्थानकावर अनोखी जनजागृती | सुरक्षित प्रवास करा, रेल्वे पोलिसांचा संदेश

## जीवन रक्षा अभियान अंतर्गत जनजागृती मोहीम

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

रेल्वे रुळ ओलांडताना होणारे अपघात, अपमृत्यू आणि जखमींच्या घटनांना आळा घालण्यासाठी कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याच्या वतीने बुधवारी दि. १७ जून २०२६ रोजी कर्जत रेल्वे स्थानकावर ङ्गजीवन रक्षा अभियानफ अंतर्गत व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेद्वारे रेल्वे प्रवाशांना सुरक्षित प्रवासाचे महत्त्व पटवून देत वाहतूक आणि रेल्वे सुरक्षेच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.



मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त यांच्या आदेशानुसार सकाळी ९ ते ११ या वेळेत कर्जत रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक १ व २ वर, सीएसएमटी आणि पुणे बाजूच्या परिसरात ही विशेष मोहीम आयोजित करण्यात आली होती. अनेक रेल्वे प्रवासी लोकल पकडण्याच्या घाईत रुळ ओलांडून जीव धोक्यात घालत असल्याचे निदर्शनास आल्याने ही मोहीम हाती घेण्यात आली.

यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण मतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मानवी साखळी निर्माण करून रेल्वे प्रवाशांना सुरक्षेचे धडे दिले. मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक देविदास वाल्मिकी, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक प्रवीण कड, आनंद लोखंडे, सूर्यकांत देसाई, सतीश व्हर्गे, पोलीस हवालदार राजेंद्र बागुल, आरपीएफ सब इन्स्पेक्टर सुहासिनी लादे यांच्यासह ३२ पोलीस अंमलदार, १ आरपीएफ जवान, २ एमएसएफ कर्मचारी, २० होमगार्ड, अभिनव ज्ञान मंदिर प्रशाळेचे ३ शिक्षक व ३० एनसीसी आणि आरएसपी विद्यार्थी तसेच कर्जत प्रवासी संघटनेचे उपाध्यक्ष शिवसेवक गुप्ता, सदस्या शर्वरी कांबळे, भारती कांबळे आदी सदस्य सहभागी झाले होते.

यावेळी प्रवाशांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध घोषणा देण्यात आल्या. अवजवी धाडस टाळा, जीवन अनमोल आहे, लाईन क्रॉसिंग करू नका, घरी कोणीतरी आपली वाट पाहत आहे, रेल्वेचे नियम पाळा, अपघात टाळा, धावती लोकल थांबत नाही, तुम्ही थांबा, वेळ वाचविण्यासाठी आयुष्य घालवू नका अशा प्रभावी संदेशांद्वारे प्रवाशांना सुरक्षिततेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

> **सुरक्षा नियमांचे मार्गदर्शन**
> उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनीही प्रवाशांना सुरक्षा नियमांचे पालन करण्याबाबत मार्गदर्शन केले. त्यामुळे रेल्वे सुरक्षा आणि अपघात प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यास मोठी मदत झाली. या मोहिमेमुळे रेल्वे प्रवाशांमध्ये रेल्वे पोलिसांविषयी सकारात्मक भावना निर्माण झाली असून सुरक्षित प्रवासासाठी नियमांचे पालन करण्याचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात यश आले.

# लिओनेल मेस्सीची विश्वचषकात हॅट्ट्रिक

| कॅन्सस | वृत्तसंस्था |

फिफा विश्वचषक २०२६ मधील अर्जेंटिनाच्या पहिल्याच सामन्यात लिओनेल मेस्सीने आपल्या जादुई खेळाने चाहत्यांना मंत्रमुग्ध केली. कॅन्सस सिटी येथील अॅरोहेड स्टेडियमवर अल्जेरियाविरुद्ध झालेल्या या सामन्यात, आपल्या कारकिर्दीतील कदाचित अखेरचा विश्वचषक खेळणाऱ्या मेस्सीने पुन्हा एकदा आपल्या सुवर्णकाळाची झलक दाखवली असून, अगदी पहिल्याच सामन्यात इतिहास घडवला आहे. त्याने अल्जेरियाविरुद्धच्या सामन्यात आपल्या कारकिर्दीतील पहिलीच विश्वचषकातील हॅट्ट्रिक नोंदवली असून, संघाला दणदणीत विजय मिळवून दिला आहे.

अल्जेरिया विरुद्धच्या सामन्यात मेस्सीने १७ व्या मिनिटाला आपली हॅट्ट्रिक साधण्यास सुरुवात केली.

## अर्जेंटिनाचा ३-० ने दणदणीत विजय

त्यावेळी त्याने यंदाच्या फिफा विश्वचषकातील आपला पहिला गोल केला. बॉक्सच्या बाहेरून मारलेल्या त्याच्या जबरदस्त आणि अचूक फटक्याने गोलरक्षकाला कोणतीही संधी न देता चेंडू थेट जाळ्यात धाडला आणि अर्जेंटिनाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पहिला हाफ मेस्सीच्या त्या एका गोलवर संपला. दुसरा हाफ सुरू होताच, अर्जेंटिनाची आघाडी १-० वरून २-० पर्यंत करण्यात मेस्सीला फारसा वेळ लागला नाही; त्याने ६० व्या मिनिटाला सामन्यातील आपला दुसरा गोल केला. त्यानंतर त्याने तिसरा गोल नेत्रदीपक पद्धतीने केला. हा गोल मेस्सीने अल्जेरियाच्या बचावफळीला पूर्णपणे भेदून केला आणि आपली हॅटट्रिक पूर्ण केली. तसेच, मेस्सीने ३-० ने संघाला दणदणीत विजय देखील मिळवून दिला.



### पेले यांचा विक्रम मोडला

लिओनेल मेस्सीने फिफा विश्वचषकाच्या इतिहासात आणखी एक सुवर्ण अध्याय लिहित ५६ वर्षांपासून अबाधित असलेला ब्राझीलचे महान खेळाडू पेले यांचा विक्रम मोडला. त्याने सामन्यातील पहिल्या गोलसह फिफा विश्वचषकाच्या पाच वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये गोल करण्याचा पराक्रम केला आहे. मेस्सीने २००६, २०१४, २०१८, २०२२ आणि २०२६ या विश्वचषकांमध्ये गोल नोंदवले आहेत. त्याने सामन्यात एकूण तीन गोल करत विश्वचषकातील त्याच्या खात्यात आता १६ गोल आणि ८ असिस्ट्स अशी एकूण २४ गोलमध्ये थेट सहभागाची नोंद झाली आहे. मेस्सीने २०२२ च्या अंतिम सामन्यात पेलेंच्या त्या विक्रमाशी बरोबरी साधली होती, तर आता तो विक्रम मागे टाकत नवा विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे.

मेस्सीने विश्वचषकातील हॅट्ट्रिक झळकावत आपल्या देदिप्यमान कारकिर्दीत आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. या हॅटट्रिकसह, फिफा विश्वचषकात सर्वाधिक गोल करण्याच्या जागतिक विक्रमाशीही मेस्सीने बरोबरी केली. विशेष म्हणजे, अर्जेंटिनासाठी खेळल्या गेलेल्या आपल्या २०० व्या सामन्यात त्याने ही कामगिरी करून दाखवली आहे.

### नव्या विक्रमाची शक्यता


ही हॅट्ट्रिकी मेस्सीच्या फिफा विश्वचषकातील पहिली हॅट्ट्रिकी असून, त्याच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ही ११ वी हॅट्ट्रिकी ठरली आहे. या हॅट्ट्रिकीसह, त्याने फिफा विश्वचषकात सर्वाधिक गोल (१६) करण्याच्या जर्मनीच्या मिरोस्लाव क्लोझच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे; आता मेस्सीच्या नावावरही विश्वचषकातील १६ गोल नोंदवले आहेत. त्याने यंदाच्या फिफा विश्वचषकातील आपला पहिला सामना खेळला आहे; त्यामुळे भविष्यात क्लोझचा विक्रम केवळ मोडला जाण्याचीच नाही, तर एक नवीन विक्रम प्रस्थापित होण्याचीही शक्यता आहे.

# भारतीय खेळाडूंची विक्रमी कामगिरी

| पुणे | प्रतिनिधी |

दक्षिण आफ्रिकेतील जगप्रसिद्ध कॉम्रेडस या आव्हानात्मक मॅरेथॉनमध्ये भारतीय खेळाडूंमध्ये पुण्याच्या तीन खेळाडूंनी विक्रमी कामगिरी केली आहे. त्यात प्रसिद्ध अल्ट्रा धावपटू आणि कोच योगेश सानप यांनी ८५.७७ किलोमीटरच्या मॅरेथॉनमध्ये ६ तास ५९ मिनिटे ५७ सेकंद अशी शानदार वेळ नोंदवत कॉम्रेड्स मॅरेथॉनच्या इतिहासातील सर्वात वेगवान भारतीय होण्याचा मान मिळवला आहे.

नुकत्याच झालेल्या या मॅरेथॉनमध्ये सानप (योसा) यांनी नवीन भारतीय राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांच्यासमवेत सार्थ साबळे यांनी ७ तास १५ मिनिटे ०८ सेकंद तर



डॉ. योगेश सातव यांनी ७ तास २४ मिनिटे ४६ सेकंद अशी वेळ नोंदवत कॉम्रेड्स मॅरेथॉनमधील अनुक्रमे दुसरे आणि तिसरे वेगवान भारतीय धावपटू म्हणून आपले नाव नोंदवले. 'द अल्टिमेट ह्युमन रेस' म्हणून ओळखल्या कॉम्रेड्स मॅरेथॉनमध्ये यंदा जगभरातून सुमारे २१ हजार ६३३ धावपटू सहभागी झाले होते. यंदाची कॉम्रेड्स मॅरेथॉनची ९९ वी आवृत्ती असून ती डर्बन ते पीटरमॅरिटझबर्ग दरम्यानची 'अप रन' (चढणीची शर्यत) होती, ज्यामध्ये पाच मोठ्या टेकड्यांचा समावेश होता.आंतरराष्ट्रीय अल्ट्रा-रनर असोसिएशन (आयएयू) च्या माहितीनुसार, पुरुषांमध्ये जॉर्ज कुशे यांनी ५ तास १५ मिनिटे ५६ सेकंदांच्या नव्या 'अप रन' रेकॉर्डसह, तर महिलांमध्ये गेर्डा स्टेन यांनी ५ तास ४९ मिनिटे ४६ सेकंदांसह प्रथम क्रमांक पटकावला. तीन वेळा बोस्टन मॅरेथॉनसाठी पात्र ठरलेल्या सानप यांनी जगातील सर्वात जुनी आणि अत्यंत मानाची समजली जाणारी ही अल्ट्रा-मॅरेथॉन ७ तासांच्या आत पूर्ण केली. याद्वारे त्यांनी या स्पर्धेत यापूर्वीचा सर्वात वेगवान भारतीय असण्याचा देवराव चौधरी यांचा विक्रम मोडला.



# वैभव झेलबाद अन् वादग्रस्त निर्णय

| दांबुला | वृत्तसंस्था |

भारत 'अ' आणि अफगाणिस्तान 'अ' यांच्यात एकदिवसीय तिरंगी मालिकेतील पाचवा सामना बुधवारी दांबुला येथे खेळला जात आहे. या सामन्यात भारताचा युवा स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशी शून्यावरच तंबूत परतणार हे निश्चित होते; मात्र, तिसऱ्या पंचांच्या एका वादग्रस्त निर्णयामुळे त्याला जीवदान मिळाले. या निर्णयामुळे अफगाणिस्तानचे खेळाडू चकित झाले. जेव्हा तिसऱ्या पंचांनी तपासले असता त्यांच्याकडे फलंदाजाला बाद देण्यासाठी पुरेसा पुरावा नव्हता. कारण त्यांना चेंडूचा काही भाग जमिनीला लागल्याचे वाटले.

# कृष्णाशेठची ऐतिहासिक कामगिरी

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

जागतिक स्तरावर धावपटूंची खरी कसोटी पाहणाऱ्या दक्षिण आफ्रिकेतील जगप्रसिद्ध ९९ व्या कॉम्रेड्स अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये श्रीवर्धन तालुक्यातील कोळेवाडी गावचे सुपुत्र कृष्णाशेठ गोसावी यांनी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. अत्यंत कठीण मानली जाणारी ही शर्यत केवळ ९ तास ३३ मिनिटांत पूर्ण करत त्यांनी सलग दुसऱ्या वर्षी या जागतिक मंचावर भारताचा आणि महाराष्ट्राचा तिरंगा अभिमानाने फडकावला आहे. कृष्णाशेठ यांनी या शर्यतीत केवळ यशच मिळवले



नाही, तर आपल्या उत्कृष्ट वेळेच्या जोरावर मानाचे रॉबर्ट मतशाली पदक देखील पटकावले. त्यांच्या या अभूतपूर्व यशामुळे रायगड जिल्हा, संपूर्ण कोकण किनारपट्टी आणि महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्रात अभिमानाची लाट पसरली आहे.

# भारताचा अफगाणांवर दणदणीत विजय

| दांबुला | वृत्तसंस्था |

भारतीय 'अ' संघाने तिरंगी एकदिवसीय मालिकेत बुधवारी (दि.१७) अफगाणिस्तानविरुद्ध १०१ धावांनी दणदणीत विजय मिळवला. त्यामुळे आता अंतिम सामन्यासाठी भारताने दावेदारी ठोकली आहे.

भारतीय 'अ' संघाने अफगाणिस्तान 'अ' संघाविरुद्ध झालेल्या एकदिवसीय मालिकेतील शेवटच्या साखळी सामन्यात १०१ धावांनी दणदणीत विजय मिळवला. त्यामुळे भारताचे ४ गुण झाले असून, नेट रन रेटही चांगला



आहे. त्यामुळे भारताने आता अंतिम सामन्यासाठी दावेदारी ठोकली आहे. या सामन्यात भारतीय 'अ' संघाने अफगाणिस्तान 'अ' संघासमोर ३२० धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तानने ३६.५ षटकात सर्वबाद २१८ धावा केल्या. अफगाणिस्तानचा तीन सामन्यांतील हा दुसरा पराभव होता. आता या तिरंगी मालिकेत भारतीय संघाचे साखळी फेरीतील चारही सामने संपले आहेत, तर अफगाणिस्तान आणि यजमान श्रीलंका 'अ' संघाचा सामना बाकी आहे. श्रीलंकेने तीन पैकी २ सामने जिंकल्याने त्यांचेही ४ गुण आहेत. अफगाणिस्तानचे २ गुण आहेत. हा सामना श्रीलंकेने जिंकला, तर श्रीलंका आणि भारत यांच्यात अंतिम सामना होईल. परंतु, जर अफगाणिस्तानने श्रीलंकेला पराभूत केले, तर मात्र तिन्ही संघ ४ गुणांवरच असतील. अशात ज्या दोन संघांचा नेट रनरेट चांगला असेल, ते दोन संघ अंतिम सामन्यात खेळतील.

# खेळपट्टीमुळे सामना थांबविण्याची नामुष्की

| टोरोंटो | वृत्तसंस्था |

काही दिवसांपूर्वीच लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडची खेळपट्टी गाजली होती. तेथे इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात पहिला कसोटी सामना खेळला गेला, तो इंग्लंडने जिंकला; मात्र, या खेळपट्टीवर पहिल्या दोन दिवशी अपेक्षेपेक्षा अधिक गडी बाद झाले. तशीच काहीशी स्थिती पाकिस्तानच्या गद्दाफी स्टेडियमची होती. या दोन्ही खेळपट्ट्यांचा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने अहवाल सादर केला असता त्यांना एक डिमेरिट



पॉइंटही दिला आहे. आता पुन्हा एकदा खेळपट्टीचे वेगळे रूप समोर आले आहे, त्यामुळे सामना चक्क रद्द करावा लागला.

टोरोंटोच्या किंग सिटी येथे दि.१६ जून रोजी होणारा कॅनडा आणि नेदरलँड्स यांच्यातील एकदिवसीय सामना धोकादायक खेळपट्टीमुळे रद्द करावा लागला. हा सामना आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक लीग २ स्पर्धेचा भाग होता. ही लीग २०२७ एकदिवसीय विश्वचषकासाठी पात्र होण्यास महत्त्वाची आहे. या ५० षटकांच्या सामन्यात केवळ २५ चेंडू टाकण्यात आले. तेवढ्याच वेळात खेळपट्टीचे परिणाम दिसू लागले आणि सामनाधिकाऱ्यांनी सामना थांबवला. लीग स्पर्धेचा हा ११४ वा सामना होता. त्यामध्ये नेदरलँड्सने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. दुसऱ्या षटकात नेदरलँड्सचा मॅक्स ओ'डॉड शून्यावर बाद झाला. त्यानंतर पुढील दोन षटके टाकण्यात आली आणि खेळपट्टीने पंच आणि रेफरींचे लक्ष वेधून घेतले. त्यांना खेळपट्टीवर प्रचंड उसळी दिसली, जी फलंदाजांसाठी घातक आणि धोकादायक ठरू शकत होती. त्यामुळे नेदरलँड्सच्या डावातील पाचवे षटक सुरू होताच त्यांनी सामना थांबवला. यावेळी कॅनडा-नेदरलँड्स एकदीवसीय सामन्यात केवळ ४.१ षटके टाकण्यात आली.

# गांगुलीच्या घरावर इडीचे छापे?

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि स्टार खेळाडू सौरव गांगुलीबद्दल एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. त्याच्या घरावर ईडीने छापा टाकल्याची खोटी बातमी सोशल मीडियावर पसरवण्यात आली होती. या अफवेमुळे क्रिकेट चाहत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली होती. मात्र, ही बातमी पूर्णपणे खोटी असल्याचे समोर आल्यानंतर स्वतः सौरव गांगुलीने याप्रकरणी मोठे पाऊल उचलले आहे. माहितीनुसार, या खोट्या बातमीची तक्रार माजी कर्णधाराने कोलकाता पोलिसांकडे केली असून अशा खोट्या अफवा पसरवणाऱ्यांवर कडक कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी सौरव गांगुलीने केली असल्याचे सांगितले जात आहे. सौरव गांगुली फॅन नावाच्या एका फेसबुक पेजवर आणि स्पोर्ट्सविकी नावाच्या वेबसाईटवर ही खोटी बातमी प्रकाशित करण्यात आली होती. या फेसबुक पेजला ३६ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. त्यामुळे ही बातमी काही वेळातच मोठ्या प्रमाणावर पसरली.

**मोबाईल गेमींकडे वाढता कल | मुले तासन्तास स्क्रीनसमोर व्यस्त**

# डिजीटल युगात मैदानी खेळ नामशेष

| धाटाव | प्रतिनिधी |

सध्याच्या डिजिटल युगात लहान मुलांमध्ये मोबाईलचे वेड प्रचंड वाढले असून, मुले तासनतास स्क्रीनसमोर व्यस्त असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासात खेळाला अधिक महत्त्व असते. विविध खेळांमुळे विद्यार्थ्यांची योग्य वयातच शारीरिक वाढ होते. तसेच, वैयक्तिक व सांघिक खेळामुळे व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व, निर्णय क्षमता, चातुर्य व सांघिक वृत्तीतही वाढ होण्यास मदत होते. मात्र, गेल्या काही वर्षांपासून मुले मैदानी खेळाऐवजी मोबाइलच्या जाळ्यात अडकत आहेत. त्यामुळे विटी-



दांडू, गोट्या, भोवरा, लगोरी, कबड्डी, क्रिकेट, खो-खो सारखे पूर्वीचे खेळ मोबाइलच्या जमान्यात नामशेष होत आहेत.

पूर्वी मुले मैदानी खेळ खेळण्यात रमायची; परंतु, आता त्याची जागा मोबाईल गेम्स आणि सोशल मीडियाने घेतली आहे. पुर्वी उन्हाळा आला की, पारंपारिक खेळ मोठ्या प्रमाणात खेळले जात होते. शहरांपेक्षा ग्रामीण भागांमध्ये सुट्ट्या पडल्या की मुले गोट्या, विटी-दांडू, भोवरा, कवड्या, लगोरी असे विविध खेळ खेळताना सर्रासपणे दिसून यायचे. हे खेळ खेळण्यासाठी साहित्य ग्रामीण भागातच उपलब्ध असायचे. पूर्वी खेळाडू एकत्रित जमले की खेळाच्या साहित्याची जमवाजमव करीत. त्यातच विटी-दांडू, गोट्या या खेळाकडे मुले मोठ्या प्रमाणात आकर्षित होत असत. परंतु, आता मैदानी खेळांची जागा व्हिडीओ गेम, मोबाइल व टीव्ही यांसारख्या वस्तूंनी घेतली आहे. त्यामुळे आधुनिक काळातील मुले जुने पारंपारिक खेळ विसरत चालले आहेत. ग्रामीण भागातील विविध खेळ शरीराला व्यायाम देणारे होते. परंतु, काल ओघात मुले मैदानी खेळ न खेळता मोबाइलकडे प्रचंड आकर्षित होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे गोट्या, विटी-दांडू सारख्या ग्रामीण भागातील खेळांची क्रेझ लोप पावत चालल्याचे दिसून येत आहे. सध्या मैदानी खेळातील क्रिकेट सोडला तर जुने पारंपारिक खेळ टिकवणे काळाची गरज बनली आहे.

आता मोबाईल गेम, टिव्ही आण सोशल मिडीयाकडे मुलांचा कल वाढला असल्यामुळे पालकवर्ग मात्र कमालीचे चिंतेत आहेत. त्यामुळे मुलांना पूर्वीचे मैदानी खेळ समजावून सांगत त्यांना ग्रामीण खेळाकडे प्रवृत्त करणे अत्यंत गरजेचे बनले आहे.

## निवडक



### श्रीलंकेचा न्युझीलंडवर थरारक विजय

**लंडन :** आयसीसी महिला टि-२० विश्वचषक सध्या सुरू आहे. त्यामध्ये मंगळवारी (दि.१६) एक मोठा उलटफेर पाहायला मिळाला. 'ब' गटातील अत्यंत महत्त्वाच्या डबल हेडर सामन्यांमध्ये श्रीलंकेने गतविजेत्या न्यूझीलंडचा ५ गडी राखून पराभव केला. तर, दुसऱ्या सामन्यात यजमान इंग्लंडने आयर्लंडवर ४ गडी राखून विजय मिळवत स्पर्धेतील आपले अपराजित स्थान कायम राखले. मात्र, श्रीलंकेच्या या विजयामुळे विश्वचषकाच्या उपांत्य फेरीची शर्यत आता अधिक रंजक बनली आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंड संघाने २० षटकांत ६ बाद १५० धावा केल्या. न्यूझीलंडकडून सोफी डिव्हाईन आणि अमेलिया केर यांनी प्रत्येकी ४५ धावांचे योगदान दिले. तर, श्रीलंकेकडून कविशा दिलहारीने शानदार गोलंदाजी करत २ बळी घेतले. त्यानेतर १५१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेच्या निलाक्षी डी सिल्वाने नाबाद ५४ धावांची मॅचविनिंग खेळी केली आणि संघाला ५ गडी राखून विजय मिळवून दिला. विशेष म्हणजे, महिला टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात न्यूझीलंडविरुद्ध श्रीलंकेचा हा पहिलाच विजय ठरला आहे. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात आयर्लंडने प्रथम फलंदाजी करत ९ बाद ११८ धावा केल्या. इंग्लंडकडून सोफी एक्लेस्टोनने ३ बळी घेत आयर्लंडच्या फलंदाजांना मोठे फटके बसू दिले नाहीत. त्यानंतर ११९ धावांचे लक्ष्य इंग्लंडने ६ गडी गमावत सहज पूर्ण केले. इंग्लंडकडून कर्णधार नॅट सायव्हर-ब्रंटने सर्वाधिक ४८ धावांची खेळी केली. मात्र, खेळीदरम्यान तिला दुखापत झाल्यामुळे तिला मैदान सोडावे लागले. त्यामुळे आगामी सामन्यात ती खेळणार की नाही, याबाबत सध्या अनिश्चितता आहे.



### रोहित-विराटबाबत मोठा खुलासा

**नवी दिल्ली :** भारत आणि इंग्लंड यांच्यातील ३ सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा या आठवड्यात होण्याची दाट शक्यता आहे. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर, मुख्य निवडकर्ता अजित आगरकर आणि कर्णधार शुबमन गिल यांच्यात संघ निवडीबाबत प्राथमिक चर्चा पूर्ण झाली असल्याची माहिती समोर येत आहे. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेपूर्वी विराट कोहली पूर्णपणे फिट होईल आणि त्याला संघात स्थान मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, गेल्या ७ सामन्यांतील खराब कामगिरीमुळे रोहित शर्मासाठी ही मालिका एक मोठी परीक्षा ठरणार आहे, तर दुखापतग्रस्त असलेला हार्दिक पांड्या देखील संघात पुनरागमन करू शकतो. या मालिकेच्या माध्यमातून अनुभवी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या एकदिवसीय प्रकारात पुनरागमनाची चर्चाही जोर धरत आहे. या महत्त्वाच्या खेळाडूंच्या समावेशामुळे भारतीय संघ इंग्लंडविरुद्ध मालिका जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरणार आहे.




### 'भारतीय संघातूनच वगळलं असतं'

**नवी दिल्ली :** भारतीय 'अ' संघाकडून १५ वर्षांचा वैभव सूर्यवंशी खेळत आहे. मात्र, त्याला अद्याप या मालिकेत फारशी छाप पाडता आलेली नाही. त्यातच त्याचे श्रीलंका 'अ' संघच्या खेळाडूंविरुद्ध सोमवारी वाद झाले. त्यावर आता संजय मांजरेकरांना भाष्य केले आहे. सोमवारच्या सामन्यात झालेल्या सुपर ओव्हरमध्ये श्रीलंका 'अ' संघाने १६ धावा केल्या आणि भारतासमोर १७ धावांचे लक्ष्य ठेवले. परंतु, या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताकडून सूर्यांश शेडगे आणि वैभव सूर्यवंशी या युवा खेळाडूंना १० धावाच करता आल्या. त्यानंतर श्रीलंकेच्या खेळाडूंकडून जोरदार सेलिब्रेश झाले. त्यावेळी सूर्यवंशीला उद्देशून शेरेबाजीही करण्यात आली. त्यानेही उलटून उत्तर दिले, त्यानंतर वातावरण तापले आणि श्रीलंकेचा खेळाडू व वैभव यांच्यात ढकला ढकली झाली. या घटनेनेनंतर संजय मांजरेकरांनी एक्सवर पोस्ट केली आहे की, जर मी भारतीय 'अ' संघाचा प्रशिक्षक किंवा मॅनेजर असतो, तर मी वैभव सूर्यवंशीला या अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यासाठी वगळले असते. मैदानात कोणत्याही परिस्थितीत शारीरिक धक्काबुक्की करणे योग्य नाही, हे समजण्यासाठी फक्त मी हे केले असते.

### गिल, इशानचा पराक्रमी खेळी

**लखनऊ :** भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात लखनऊच्या इकाना क्रिकेट स्टेडियमवर एकदिवसीय मालिकेतील दुसरा सामना खेळवला गेला. या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना ४९.५ षटकांत ४०१ धावांचा डोंगर उभारला.



संघाला या मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहोचवण्यात कर्णधार शुबमन गिल आणि ईशान किशन यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, या दोघांनीही शतकी खेळी केली. यावेळी शुबमन गिलने ७७ चेंडूत आपले शतक पूर्ण केले, तर ईशान किशनने एकदिवसीय कारकिर्दीतील तिसरे शतक अवघ्या ७१ चेंडूत साजरे केले. या कामगिरीसह त्यांनी यापूर्वी एकाच एकदिवसीय सामन्यात दोन भारतीय खेळाडूंना कधीही जमला नव्हता असा पराक्रम केला आहे. एकाच सामन्यात दोन खेळाडूंनी ८० किंवा त्यापेक्षा कमी चेंडूत शतके ठोकली आहेत. एकदिवसीय क्रिकेटच्या जागतिक इतिहासात अशी घटना घडण्याची ही केवळ आठवी वेळ आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)